SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०३.०७.२०२६ | अंक नं. ०८० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

IGI सर्टीफाईड डायमंड ज्वेलरी आता आपल्या बजेटमध्ये !
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ ९९९/-*
Conditions Apply*

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

# वाहतूक व्यवस्थेच्या अधिक सुरक्षिततेसाठी नगरमध्ये ४ ते १० जुलैदरम्यान 'ट्रायल रन'

### पोलिसांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन

नगर - शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध व नागरिकाभिमुख करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि महानगरपालिकेच्या वतीने डीएसपी चौक व कायनेटिक चौक येथे ४ ते १० जुलै या कालावधीत 'वाहतुकीचा ट्रायल रन' राबविण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत करणे, वाहतूक कोंडीची समस्या कमी करणे, अपघातांचे प्रमाण घटविणे तसेच नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. नवीन वाहतूक व्यवस्था कायमस्वरूपी लागू करण्यापूर्वी तिची परिणामकारकता प्रत्यक्ष तपासणे आवश्यक असल्याने हा 'ट्रायल रन' आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनचालकांनी संयम बाळगून वाहतूक पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

या प्रायोगिक कालावधीत नागरिकांचे सहकार्य, सूचना आणि अभिप्राय प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, अभिप्राय आणि प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे वाहतूक व्यवस्था भविष्यात अधिक प्रभावी, सुरक्षित व नागरिकांच्या सोयीची करण्यात येणार आहे.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सुरक्षित वाहतूक संस्कृती रुजविण्यासाठी सर्व नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी कळविले आहे.

# गतवर्षीपेक्षा यंदा जूनमध्ये कमी पाऊस, खरीप हंगाम संकटात

### तब्बल २३ येलो अलर्ट फोल; राहुरी, अकोले, संगमनेरसह अनेक तालुक्यांत स्थिती गंभीर

नगर - यंदाच्या मान्सूनच्या सुरुवातीलाच भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यासाठी जून महिन्यात तब्बल २३ दिवस येलो अलर्ट जारी केले. मात्र, प्रत्यक्षात केवळ तीन-चार दिवसच समाधानकारक पाऊस झाल्याने बहुतांश अलर्ट ढगातच विरले. परिणामी, जून महिन्यात जिल्ह्यात केवळ ६६.७ मिमी पावसाची नोंद झाली. म्हणजेच ४१.५ मिमीची तूट राहिली असून, हा पाऊस सरासरीच्या ६१.६ टक्के इतकाच झाला आहे.

जिल्हा प्रशासनाच्या महसूल विभागाने २ जुलै रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत पर्जन्यमान अहवालानुसार, जून ते २ जुलै या कालावधीत जिल्ह्यात एकूण ७० मिमी पावसाची नोंद झाली आहे. या कालावधीतील अपेक्षित ११४.५ मिमी पावसाच्या तुलनेत ही नोंद ६१.१ टक्के इतकी आहे. गतवर्षी २ जुलैपर्यंत जिल्ह्यात ८२.२ मिमी पाऊस झाला होता. तो त्यावेळच्या सरासरीच्या ७१.८ टक्के होता. त्या तुलनेत यंदा १२.२ मिमीने कमी पाऊस झाला आहे. यंदा मान्सूनच्या सुरुवातीलाच पावसाने ओढ दिल्याने शेतकरी वर्गात चिंता वाढली आहे.

### दक्षिणेत पाऊस जास्त; उत्तरेत अत्यल्प

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीवरुन जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी दक्षिण जिल्ह्यात पावसाचे प्रमाण जास्त तर उत्तरेत अत्यल्प दिसून येत आहे. कर्जत तालुक्यात सर्वाधिक १४८.८ मिमी पावसाची नोंद झाली असून तो सरासरीच्या १३७.९ टक्के आहे. जामखेडमध्ये १२२.५ मिमी (८६.७ टक्के), नेवासामध्ये ८८.४ मिमी (८५.९ टक्के), पारनेरमध्ये ६०.३ मिमी (५७.२ टक्के), श्रीगोंदामध्ये ८४.६ मिमी (८१.० टक्के), पाथर्डीमध्ये ८०.९ मिमी (६५.७ टक्के) आणि नगरमध्ये ७८.२ मिमी (६९.२ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. याउलट उत्तरेतील तालुक्यांत राहुरीमध्ये केवळ १९.४ मिमी (१७.३ टक्के), अकोलेमध्ये ३१.६ मिमी (२५.६ टक्के), संगमनेरमध्ये ३१.९ मिमी (३३.० टक्के), राहातामध्ये ३५.४ मिमी (२७.७ टक्के), कोपरगावमध्ये ४४.७ मिमी (४०.७ टक्के), श्रीरामपूरमध्ये ६६.८ मिमी (५०.३ टक्के) पाऊस झाला आहे. या तालुक्यात अद्यापही सरासरीच्या तुलनेत मोठी तूट कायम आहे. त्यामुळे भविष्यात टंचाई योजनांचा लाभ प्राधान्याने या तालुक्यांना मिळू शकतो.

### पेरण्या खोळंबल्या; शेतकरी धास्तावला

जून महिन्यात पुरेसा पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील खरीप पेरण्यांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक भागांत अद्याप पेरणीयोग्य पाऊस न झाल्याने शेतकरी प्रतीक्षेत आहेत. विशेषतः नगर तालुक्यात केवळ ६ टक्के पेरण्या झाल्याचे तालुका कृषी कार्यालयाकडून सांगण्यात आले. पावसाचा खंड कायम राहिल्यास खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मान्सूनची अपेक्षित प्रगती न झाल्याने जिल्ह्यातील धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा नाही. जलसाठ्यात घट होत असल्याने पिण्याच्या पाण्याचीही चिंता वाढू लागली आहे. ग्रामीण भागात पाणीटंचाईचे सावट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. २३ जूननंतर काही प्रमाणात पाऊस झाला. मात्र, हा पाऊस पेरणीयोग्य नाही. पेरणीसाठी १०० ते १२५ मिमी पावसाची गरज आहे. प्रत्यक्षात निम्मेही पाऊसमान नाही. त्यामुळे सर्वत्र पेरण्या रखडल्याचे चित्र आहे.

Well known Name in The Field of Education Since 32 Years
J.J.M.F. JIVAN JYOT MEDICAL FOUNDATION
INSTITUTE OF PARA MEDICAL SCIENCES
1 नर्सिंग कोर्सेस
2 PGDMLT-P.G. Dip. In Medical Lab Tech
3 DMLT - Dip in Medical Lab Tech.
4 Operation Theater Assistant / Tech.
5 Dental Mechanics Technician (कृतिम दात व कवळी बनविणे)
6 Dip. in Physiotherapy
7 X-Ray / ECG / C.T. Scan / MRI / Sonography / Dialysis Tech. / Cath lab Tech.
8 Optometry / Optician Tech (चष्मांचे नंबर, चश्मे, काचा व फ्रेम बनविणे.) Contact Lences
9 Health & Sanitory Inspector
10 MPW - MULTI PURPOSE HEALTH WORKER
BOMBAY ACADEMY OF ARTS & EDUCATION प्रवेश सुरु
1. Pre Primary School / Montesary Teachers Course. (बालवाडी / अंगणवाडी शिक्षिका)
2. Construction Supervisor (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) बांधकाम पर्यवेक्षक (ITI समकक्ष) (Assistant Engineer)
3. Dip. In Computer Technology { Operating System, Graphics Designing. Website Designing, Software Developer, Networking, Database Operator }
4. Fire & Safety Management
5. Diploma In Electrician
उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी
No Donation माफक शुल्क | शिष्यवृत्ती व बँक कर्जसाठी मार्गदर्शन | बाहेरील विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल व मेस ची सुविधा उपलब्ध
8830685732 / 9637388388
बॉम्बे हॉस्पिटल बिल्डिंग / बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, नगर- छ.संभाजीनगर रोड, नवीन महानगरपालिका ऑफीस समोर, अहिल्यानगर - ४१४००१ Website : www.jjmf.info

तुमचं असणं सर्वकाही होतं. आयुष्यातील एक ते सुंदर पर्व होतं.
आज सर्वकाही असल्याची जाणीव आहे पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे..
भावपूर्ण श्रध्दांजली



कै. संजय (काका) रामचंद्र शेळके
(मृत्यू दि.२५/६/२०२६)
।। दशक्रिया विधी ।।
शनिवार दि.०४ जुलै २०२६ रोजी सकाळी.०८.०० वाजता
ठिकाण : अमरधाम नालेगाव, अहिल्यानगर
।। शोकाकुल ।।
श्रीमती. द्रौपदी रामचंद्र शेळके (आई) | श्री. अशोक रामचंद्र शेळके (भाऊ)
श्रीमती. संगीता अंबादास पठारे (बहिण) | श्री. किरण अशोक शेळके (पुतने)
गं.भा. सुमन संजय शेळके (पत्नी) | श्री. राहुल अशोक शेळके (पुतने)
सौ. प्रिती विजय गडाख (पुतणी) | पै. चैतन्य संजय शेळके (मुलगा)
सौ. भाग्यश्री मयुर काळे (मुलगी) | कु. वैष्णवी संजय शेळके (मुलगी)
श्री. मयुर संजय काळे (जावई)
• समस्त शेळके, काळे, लांडे, पठारे, कवडे, वांढेकर परिवार •
प्रवचन सेवा : ह.भ.प.पांडुरंग महाराज फसले यांचे प्रवचन सकाळी ८ ते ९ या वेळेत होईल.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे. आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421




डॉ. पंडित दीप डेंटल क्लिनिक
**विजय महादर** वय ८२ वर्षे. गेली ४० वर्षापासून मी डॉ. दत्तात्रय पंडित यांच्याकडून दातांवर उपचार घेत आहे. आता डॉ. सौरभ पंडित व डॉ. प्राची पंडित यांचेकडूनही उपचार घेत आहे. अल्पदरात प्रभावी उपचार मिळाल्याने मी समाधानी आहे. डॉ. डे निमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करताना सोबत डॉ. सौरभ पंडित आणि डॉ. प्राची पंडित
डॉ. पंडित दीप डेंटल क्लिनिक

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# कोयता घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाला पोलिसांनी पकडले

नगर - शहरातील पोस्ट ऑफिस ते अशोका हॉटेलकडे जाणाऱ्या रोडवर लोखंडी कोयता बाळगून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या एका २० वर्षीय तरुणाला कोतवाली पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. अजिंक्य रामभाऊ ठाणगे (वय २०, रा. हरी मळा, सोलापूर रोड, सारसनगर) असे पकडलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्या विरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, २ जुलै रोजी दुपारी ४.२० वाजेच्या सुमारास कोतवाली पोलीस ठाण्याचे पो. कॉ. सचिन लोळगे हे सहकाऱ्यांसह पेट्रोलिंग करत असताना त्यांना या प्रकाराबाबत माहिती मिळाली. पोस्ट ऑफिस ते अशोका हॉटेलकडे जाणाऱ्या रोडवर एक तरुण घातक शस्त्र घेऊन फिरत होता आणि परिसरात दहशत निर्माण करत होता. पोलिसांनी तातडीने कारवाई करत घटनास्थळी धाव घेऊन संशयित आरोपी अजिंक्य ठाणगे याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे १५ इंच लांब पाते व ९ इंच लांब मूठ असलेला एक लोखंडी कोयता मिळून आला. पोलिसांनी तो कोयता जप्त केला आहे. याप्रकरणी पो. कॉ. सचिन लोळगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपी अजिंक्य ठाणगे याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम (आर्म ॲक्ट) १९५९ चे कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केडगावमध्ये किरकोळ कारणावरून पिग्मी एजंटवर टोकदार वस्तूने हल्ला

नगर - घराच्या मागे असलेले प्लास्टिक पाईप तोडल्याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या एका पिग्मी एजंटला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून टोकदार वस्तूने छातीवर वार केल्याची घटना केडगाव परिसरातील एकनाथनगर येथे घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अतुल विठ्ठल म्हस्के (वय ४४, रा. एकनाथनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास त्यांच्या एकनाथनगर येथील घराच्या परिसरात होते. संशयित आरोपी शंकर श्रीपती कोतकर (रा. एकनाथनगर, केडगाव) याने फिर्यादी अतुल म्हस्के यांच्या घराच्या मागे असलेले प्लास्टिक पाईप तोडून नुकसान केले होते. हे नुकसान पाहण्यासाठी अतुल गेले असता, आरोपी शंकर कोतकर याने त्यांना पाहताच शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तू या जागेत पाय ठेवायचा नाही, तू येथे आला तर तुला जिवानिशी मारून टाकेन, अशी धमकी देत आरोपीने अतुल यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच आरोपीने त्याच्या जवळील एका टोकदार वस्तूने अतुल यांच्या छातीवर जोराचा वार केला, ज्यामुळे त्यांच्या छातीतून रक्त येऊ लागले.

हा प्रकार पाहून फिर्यादी अतुल यांची आई त्यांना वाचवण्यासाठी धावून आली असता, आरोपीने त्यांनाही शिवीगाळ करून हाताच्या चापटीने मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबातील लोकांना जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी तिथून फरार झाला. या प्रकरणी जखमी अतुल म्हस्के यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी शंकर श्रीपती कोतकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) आणि ३२४ (४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

महिला पोलीस नाईक अनिता तारडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अहिल्यानगर शहरात एकाच दिवसात ३८ नागरिकांना कुत्र्यांनी घेतला चावा

**आठ दिवसांत उपाययोजना करा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन; हा प्रश्न विशेष बाब म्हणून महासभेत घ्या; महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन**

नगर - शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा प्रचंड सुळसुळाट झाला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काल एकाच दिवशी शहरातील तब्बल ३८ नागरिकांना पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतले आहे. महानगरपालिकेकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्यामुळे मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.



मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नाबाबत उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादीच्या वतीने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांच्या दालनात आंदोलन करण्यात आले. (छाया - लहू दळवी)

मागील महासभेमध्ये मोकाट कुत्र्यांचा विषय मांडण्यात आला होता. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करणे अपेक्षित होते; मात्र प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी उपाययोजना झालेली दिसून येत नाही. सर्व काम केवळ कागदोपत्री सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा प्रश्न विशेष बाब म्हणून पुढील महासभेच्या अजेंड्यावर घेण्यात यावा, अशी मागणी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.नागरिकांच्या प्रश्नांसाठी लोकांना महापालिकेत आंदोलन करण्याची वेळ येऊ नये. त्यापूर्वीच प्रशासनाने ठोस आणि परिणामकारक उपाययोजना करणे आवश्यक आहे, असेही संपत बारस्कर यांनी स्पष्ट केले.

या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या वतीने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांच्या दालनात आंदोलन करण्यात आले.

यावेळी संपत बारस्कर, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक बाळासाहेब पवार, महेश तवले, अजिंक्य बोरकर, मयूर बांगरे, वैभव ढाकणे, सुशांत जाधव, सुरज कोतकर, दीपक खेडकर, जॉय लोखंडे, सागर गुंजाळ, सुरज शिंदे, भाऊ बारस्कर, ऋषिकेश ताठे, नितीन लिगडे, रवी दंडी, आनंद राठोड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

आंदोलनानंतर अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करत सांगितले की, पिंपळगाव माळवी येथे मोकाट कुत्र्यांसाठी निवारण केंद्र उभारण्याचे काम सुरू असून प्रशासनाकडून तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील.

### महापालिका आणखी मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का?

शहरामध्ये काल पिसाळलेल्या कुत्र्याने अक्षरशः धुमाकूळ घालत ३८ नागरिकांना चावा घेतला. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संपत बारस्कर म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत तीव्र आंदोलन करून मोकाट कुत्र्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या व्यथा मांडणे आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवाज उठवणे हे आमचे कर्तव्य आहे. मोकाट कुत्रे नागरिकांवर जीवघेणे हल्ले करत आहेत. यापूर्वीही एका निष्पाप बालकाचा कुत्र्यांच्या हल्लूयात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आणखी एखादी दुर्दैवी घटना घडण्याची वाट महापालिका पाहत आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन येत्या आठ दिवसांत प्रभावी उपाययोजना न झाल्यास आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# जुना गुन्हा मागे घेण्यास नकार दिल्याने सावेडीत एका जणावर लोखंडी वस्तूने हल्ला

नगर - पोलीस ठाण्यात पूर्वी दाखल केलेला गुन्हा मागे घेण्यास नकार दिल्याच्या रागातून एका व्यक्तीने तरुणावर लोखंडी टणक वस्तूने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना सावेडी परिसरातील सिव्हिल हाडको येथे घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुहास बाबासाहेब जगताप (वय ४१, रा.सिव्हिल हाडको, सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १ जुलै रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास त्यांच्या राहत्या घराच्या गेटसमोरील रस्त्यावर उभे होते. यावेळी त्यांच्याच गल्लीत राहणारा आरोपी लाभेश जवाहरलाल चंगेडीया हा तेथे आला. लाभेशने सुहास यांना, पूर्वी दाखल केलेला गुन्हा मागे घे, असे म्हटले. मात्र, सुहास यांनी गुन्हा मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला.

या नकाराचा राग आल्याने आरोपी लाभेश चंगेडीया याने त्याच्या हातातील कोणतीतरी लोखंडी टणक वस्तू सुहास जगताप यांच्या उजव्या पायाच्या पोटरीवर जोरात मारली. या हल्लूयात सुहास हे जखमी झाले. त्यानंतर आरोपीने त्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर जखमी सुहास जगताप यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी आरोपी लाभेश चंगेडीया याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटला करत आहेत.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे बनावट पत्र सादर करून शासनाची फसवणूक; नगरमधील कन्स्ट्रक्शन कंपनीचे संचालक आणि प्रतिनिधीविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - रिजनल ड्रायव्हिंग ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे बनावट पत्र तयार करून शासनाची दिशाभूल आणि फसवणूक केल्याचा प्रकार नगरमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी बुरुडगाव रोड येथील 'साई कन्स्ट्रक्शन' कंपनीचे संचालक आणि त्यांचा प्रतिनिधी राहुल म्हस्के यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे.

याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कनिष्ठ लिपिक विशाल संतोष साळवे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, केंद्र सरकारच्या परिवहन मंत्रालयाने १५ जानेवारी २०२५ रोजी जाहीर केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार रिजनल ड्रायव्हिंग ट्रेनिंग सेंटर सुरू करण्याची योजना सुरू आहे. या योजनेअंतर्गत साई कन्स्ट्रक्शन कंपनीने ७ ऑक्टोबर २०२५ रोजी येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात मदडगाव येथे ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यासाठी एक प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने जागेची पाहणी करण्यासाठी मोटार वाहन निरीक्षक मंगेश वाघ यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी या जागेची पाहणी करण्याचा प्रयत्न केला असता, तिथे जाण्यासाठी केवळ कच्चा मातीचा रस्ता असल्याने ते पोहोचू शकले नाहीत आणि तसा अहवाल त्यांनी आरटीओ अधिकाऱ्यांना सादर केला. ही बाब कंपनीचे प्रतिनिधी राहुल म्हस्के यांना कळवण्यात आली होती.

यानंतर, ३ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालयाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपकार्यकारी अभियंत्यांच्या नावे असलेले एक पत्र प्राप्त झाले. या पत्रात नगर-पाथर्डी रोड ते पारगाव या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण मंजूर असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे आणि दोन ते तीन महिन्यांत रस्ता पूर्ण होईल, असा मजकूर नमूद होता. मात्र, हा रस्ता प्रस्तावित ट्रेनिंग सेंटरपर्यंत जातो की नाही, याबाबत संशय आल्यामुळे परिवहन कार्यालयाने २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या पत्राची खात्री करण्यासाठी पत्रव्यवहार केला.

त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपकार्यकारी अभियंत्यांनी ४ डिसेंबर २०२५ रोजी आरटीओ कार्यालयाला लिखित उत्तर देऊन धक्कादायक खुलासा केला. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून असे कोणतेही पत्र जारी करण्यात आले नसून, त्या पत्रावरील स्वाक्षरी खोटी आहे आणि मजकुराशी त्यांचा काहीही संबंध नाही, असे स्पष्ट करण्यात आले. रिजनल ड्रायव्हिंग ट्रेनिंग सेंटरला मंजुरी मिळवण्यासाठी संबंधितांनी शासकीय अधिकाऱ्यांचे बनावट पत्र तयार करून शासनाची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# टेम्पोला कट मारल्याच्या वादातून दोघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण

नगर - टेम्पोला दुचाकीस्वाराने कट मारल्याच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादाचे पर्यावसान गंभीर हाणामारीत झाल्याची घटना एमआयडीसी परिसरातील लामखेडे चौकात घडली आहे. या मारहाणीत एक जण गंभीर जखमी झाला असून याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत दिलीप बाळासाहेब आंबेडकर (वय ३८, रा. वडगाव गुप्ता, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २० जून रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास त्यांचे मित्र दीपक जोशी यांच्यासह टेम्पोने वडगाव गुप्ता येथे घरी चालले होते. लामखेडे चौक एमआयडीसी येथे आले असता, एका मोटरसायकलस्वाराने त्यांच्या टेम्पोला कट मारला. यावरून त्यांच्यात किरकोळ वाद झाला. या वादाचा राग आल्याने संशयित आरोपी निलेश पाठक (रा. निंबळक, कळसे वस्ती, ता. नगर) याने फिर्यादी दिलीप आंबेडकर यांच्या पोटात जोरात लाथ मारून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच त्याच्यासोबत असलेल्या इतर तीन अनोळखी इसमांनी दिलीप आणि त्यांचे मित्र दीपक जोशी यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आरोपींनी त्यांना शिवीगाळ व दमदाटी करत तुला लय माज आला आहे काय, आज तुझा माजच उतरवतो असे म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेनंतर जखमी दिलीप आंबेडकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांनी आरोपी निलेश पाठक आणि त्याच्या तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११७ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) आणि ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पो.हे.कॉ. टेमकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## माणिक चौकातून मोटारसायकलची चोरी

नगर - शहरातील माणिक चौक परिसरातील भिंगारवाला दुकानाच्या गल्लीतून एक हिरो होंडा कंपनीची एच एफ डीलक्स मोटारसायकल (क्र.एमएच १६बीक्यू ४८८६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३० जून रोजी सायंकाळी ६.४५ ते ७ वाजेच्या कालावधीत घडली.

याबाबत कामरान शेख (वय ३४, रा. राधाकृष्ण मंदिराजवळ, संकल्प कॉलनी, बुऱ्हाणनगर, ता. जि. अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मंगलबाई धिरडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - चित्रा टॉकीज मागील धिरडे सदन येथील रहिवासी



सौ. मंगलबाई धिरडे (वय ७३) यांचे ३ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे, दीर, जावा असा परिवार आहे. अशोक धिरडे यांच्या त्या पत्नी होत.

## रुक्मिणीबाई दंडी यांचे दु:खद निधन



नगर - तोफखाना, पंचरंगगल्ली येथील रहिवासी रुक्मिणीबाई किष्टय्या दंडी (वय ९०) यांचे ३ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत व शंकर दंडी यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# केडगाव येथील प्लास्टिक पाईप व्यापाऱ्याची १.५२ लाखांची फसवणूक; ऑर्डर केलेले २५० पीव्हीसी पाईप लंपास करत पैसे न देता झाला गायब

नगर - मोबाईल फोनवरून ३०० पीव्हीसी प्लास्टिक पाईपची ऑर्डर देऊन व्यापाऱ्याचा विश्वास संपादन करत, कोणताही आर्थिक मोबदला न देता १ लाख ५२ हजार ५०० रुपये किमतीचे २५० पाईप घेऊन पोबारा केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी येथील कोतवाली पोलीस ठाण्यात दीपक गुगाडे (रा. नारायण गव्हाण, ता. पारनेर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत केडगाव इंडस्ट्रियल एरियातील 'मोहक ग्रो इंडस्ट्री'चे मालक आशुतोष विनोद बोथरा (वय ३४, रा. राजज्योती नगर, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बोथरा यांचा केडगाव औद्योगिक वसाहत येथे पीव्हीसी प्लास्टिक पाईप बनवण्याचा व्यवसाय आहे. १ जुलै रोजी आशुतोष यांचे चुलत भाऊ ऋषभ बोथरा हे फॅक्टरीमध्ये असताना, त्यांना दीपक गुगाडे नावाच्या व्यक्तीने मोबाईलवर संपर्क साधला. आपण पारनेर तालुक्यातील नारायण गव्हाण येथील रहिवासी असून शेतीसाठी ३ इंची ३०० पीव्हीसी पाईप हवे आहेत, असे त्याने सांगितले. तसेच पाईपची डिलिव्हरी मिळाल्यावर पूर्ण पैसे रोख देण्याचे आश्वासन देऊन त्याने बोथरा यांचा विश्वास संपादन केला. त्यानुसार २ जुलै रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास फॅक्टरीतील कामगार गोरख जाधव यांच्या ट्रकमधून ३०० पाईप सुपा येथे पाठवण्यात आले.

यानंतर सुपा चौक येथे पोहोचल्यावर संशयित आरोपी दीपक गुगाडे याने एका टाटा टेम्पोमध्ये १ लाख ५२ हजार ५०० रुपये किमतीचे २५० पाईप लोड करून घेतले आणि उर्वरित ५० पाईप नारायण गव्हाण येथील पेट्रोल पंपाजवळ खाली करून संपूर्ण पेमेंट एकत्र करतो असे सांगितले. मात्र, कामगार पेट्रोल पंपाजवळ पोहोचले असता, आरोपीने स्वतःचा मोबाईल फोन बंद करून घेतला. रात्री साडेआठ वाजेपर्यंत वारंवार संपर्क करूनही त्याने फोन न उचलल्याने आपली फसवणूक झाल्याचे बोथरा यांच्या लक्षात आले.

या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी दीपक गुगाडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२) आणि ३१८ (४) अन्वये गुन्हा नोंदवला असून, पोलीस शिपाई राहुल नारायण शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नगरमध्ये भररस्त्यात ठेकेदाराला अडवून मारहाण करत लुटले

नगर - शहरातील तपोवन रोड परिसरामध्ये दोन अनोळखी इसमांनी एका ठेकेदाराच्या गाडीला कट मारल्याचा बहाणा करून त्यांना जबरदस्तीने गाडीखाली उतरवले आणि फायबरच्या पाईपने डोक्यात मारून जखमी करत २७ हजार रुपयांची रोकड आणि मोबाईल फोन लुटल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शिवाजी भानुदास वाघमोडे (वय ४१, रा. सिद्धीविनायक नगर, जुना पिंपळगाव रोड, तपोवन रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे व्यवसायाने ठेकेदार आहेत. १ जुलै रात्री १० वाजेच्या सुमारास ते तपोवन रोडवर मंदिराच्या जवळ कामगारांना सोडून आपल्या स्कॉर्पिओ गाडीने घरी चालले होते. स्वराज्य ट्रेडर्स जवळ आले असता, पाठीमागून काळ्या रंगाच्या मोपेड दुचाकीवरून दोन अनोळखी इसम आले. त्यांनी वाघमोडे यांच्या गाडीला कट मारल्याचे कारणावरून वाद घालण्यास सुरुवात केली आणि शिवीगाळ करत एका इसमाने त्यांना शर्ट धरून गाडीबाहेर ओढले. त्यानंतर दुसऱ्या इसमाने हातातील फायबरच्या पाईपने वाघमोडे यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. एवढ्यावरच न थांबता संशयित आरोपींनी जबरदस्तीने त्यांच्याच गाडीमध्ये बसून त्यांना भिस्तबाग चौकातून पुढे सावेडी गावाच्या दिशेने रस्त्याच्या कडेला नेले. तिथे आरोपींनी वाघमोडे यांच्या खिशातील २७ हजार रुपयांची रोकड आणि विवो कंपनीचा मोबाईल फोन जबरदस्तीने काढून घेतला व जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेनंतर जखमी अवस्थेतील वाघमोडे यांनी चुलत भाऊ अभिजीत वाघमोडे याला फोनवरून घडलेला प्रकार सांगितला. याप्रकरणी शिवाजी वाघमोडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी दोन अनोळखी इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), १४०(३), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

या घटनेचा पुढील तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत.

## कारागृहातील कैद्यांकडे आढळला मोबाईल

श्रीगोंदा - श्रीगोंदा येथील ब्रिटिशकालीन दुय्यम कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी घटना समोर आली आहे. कारागृहातील बराक क्रमांक ४ मध्ये न्यायालयीन कोठडीत असलेल्या कैद्यांकडे मोबाईल फोन आढळून आला आहे. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीगोंदा तहसील कार्यालय अंतर्गत पोलीस ठाण्याच्या निगराणी मध्ये ब्रिटिशकालीन दुय्यम कारागृह आहे या दुय्यम कारागृहात एकूण चार बराक असून त्यामध्ये प्रमाणापेक्षा जास्त आरोपी आहेत त्यातच १ जुलै रोजी दुय्यम कारागृहातील बराक क्रमांक चार मध्ये न्यायालयीन कोठडीत असलेल्या दोन कैद्यांकडे एक मोबाईल व चार्जर आढळून आले. हा मोबाईल नेमका कारागृहात कसा पोहोचला, याचा पोलीस शोध घेत आहेत.

या प्रकरणी प्रभारी तुरुंगअधिकारी बाबुराव नामदेव कारखिले यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी कैदी वैभव सुभाष चौधरी व साई संजय मदने या दोघांच्या विरुद्ध कारागृह कायदा अधिनियम १८९४ चे कलम ४२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### रात्रीचे जेवण सूर्यास्तापूर्वी ठरेल आरोग्याची गुरुकिल्ली

आधुनिक विज्ञानानेही आता मान्य केले आहे की रात्री ७ च्या आधी जेवण केल्याने शरीराला जबरदस्त फायदे होतात. सूर्य मावळल्यानंतर आपल्या शरीरातील 'पचनाग्नी' म्हणजेच मेटाबॉलिझम मंदावतो. त्यामुळे उशिरा जेवल्यावर अन्न नीट पचत नाही. ते पोटात सडते, गॅस, ॲसिडिटी, अपचन सुरू होते. सूर्यास्तापूर्वी जेवल्याने सर्वात मोठा फायदा म्हणजे वजन आटोक्यात राहते. रात्री उशिरा खाल्लेल्या कॅलरीज शरीर फॅटमध्ये बदलून साठवते. कारण झोपेत आपली हालचाल नसते. पण लवकर जेवले तर जेवण पचायला ३-४ तास मिळतात. झोपेपर्यंत पोट रिकामे होते. त्यामुळे लठ्ठपणा, फॅटी लिव्हरचा धोका ४०% ने कमी होतो. मधुमेही रुग्णांसाठी तर हा नियम सोन्याहून पिवळा आहे. लवकर जेवण केल्याने रात्रीची शुगर वाढत नाही आणि सकाळची फास्टिंग शुगर एकदम नॉर्मल येते. झोपेच्या गुणवत्तेवरही याचा थेट परिणाम होतो.

## पाककला

### नारळ-पेढा लाडू

**साहित्य :** ताजा खोवलेला नारळ १ वाटी, कंडेन्स्ड मिल्क १/२ वाटी, वेलची पावडर १/४ चमचा, साजूक तूप १ चमचा, काजू-बदाम काप २ चमचे, खसखस १ चमचा सजावटीसाठी

**कृती :** जाड बुडाच्या कढईत तूप गरम करा. त्यात खोवलेला नारळ घालून मंद आचेवर २-३ मिनिटे परतून घ्या. नारळाचा कच्चा वास गेला पाहिजे, पण रंग बदलू देऊ नका. आता कंडेन्स्ड मिल्क घालून सतत हलवत राहा. ४-५ मिनिटांत मिश्रण घट्ट होऊन कढईच्या कडा सोडू लागेल. गॅस बंद करून वेलची पावडर व ड्रायफ्रूट काप मिसळा. मिश्रण हाताला न चिकटेल इतके कोमट झाल्यावर लहान लिंबाएवढे लाडू वळा. प्रत्येक लाडू खसखशीत घोळवून ताटात ठेवा. १५ मिनिटे फ्रीजमध्ये सेट करायला ठेवा म्हणजे लाडू छान कडक होतील.

## वास्तू

### बेडरुम व आरसा

✻ बेडरूममध्ये आरसा पलंगाला दिसेल असा लावू नका. झोपेतून उठल्याबरोबर स्वतःची प्रतिमा दिसणे वास्तुदोष मानला जातो.

✻ पलंग लाकडी असावा आणि त्याला साठवणुकीचा बॉक्स नसावा. पलंगाखाली अडगळ, जुन्या वस्तू, चपला ठेवल्याने झोपेमध्ये अडथळे येतात. ऊर्जा खाली खेचली जाते आणि स्वप्नात भीतीदायक गोष्टी दिसतात.

## सौंदर्य

कच्चा बटाटा किसून त्याचा रस काळ्या डागांवर २० मिनिटे लावून ठेवा. आठवड्यातून ३ वेळा करा. बटाट्यातील 'कॅटेकोलेज' नावाचे एन्झाइम पिगमेंटेशन कमी करते आणि त्वचा उजळते.

## सल्ला

पांढऱ्या कपड्यांवर डाग पडल्यास लगेच लिंबू आणि मीठ चोळा. १० मिनिटे उन्हात वाळवा. डाग नाहीसा होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**शनिवार, दि. ४ जुलै २०२६**

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, धनिष्ठा १३।४४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. आपल्या क्रोधावर संयम ठेवल्याने दिवस आनंदात जाईल.

**वृषभ** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. मातृपक्षाकडून सहयोग मिळेल. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे.

**मिथुन** : घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल. आपला निष्काळजी दृष्टीकोण आज चांगला ठरणार नाही.

**कर्क** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल.

**सिंह** : अधिक श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल.

**कन्या** : सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होणार नाही. एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल. अडचणी येण्याची शक्यता आहे.

**तूळ** : व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**वृश्चिक** : आज रात्री विश्रांती घ्या. घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील. ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल.

**धनु** : विद्यार्थ्यांसाठी वेळ उत्तम. वाद-विवाद किंवा प्रतिस्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल.

**मकर** : आजचा दिवस आपल्यासाठी नवीन सुरुवात करणे किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय निर्धारित करण्यात सहायक ठरेल.

**कुंभ** : नोकरदार व्यक्तींनी कार्यात सहयोग घेऊन चालावे. भविष्यात मान-सन्मानात वाढ होईल.

**मीन** : प्रसिद्धी मिळेल. अडकेलेली कार्ये योग्य वेळी होतील. नोकरदार व व्यापारी बंधूंना लाभ मिळेल. आपल्या मनात असलेल्या योजना पूर्ण होतील.

## शब्दगंध क्र. ७४६५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | | | | | ■ | |
| ■ | ८ | | ■ | | ■ | ९ | |
| १० | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | |
| १४ | १५ | ■ | | ■ | १६ | | |
| १७ | | १८ | | ■ | १९ | | ■ |
| ■ | २० | | ■ | २१ | ■ | २२ | २३ |
| २४ | | | ■ | २५ | | | |

**आडवे शब्द :-** १) मुद्रा; चर्या ४) सावध रहा; खबरदार ७) पालनपोषण ८) एक प्रकारची तांबडी माती; गेरू ९) 'सहा' या अर्थाने विटीदांडूच्या खेळातील -संज्ञा ११) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र १३) लहान मुलाचा मुका १४) उपहास; फजिती; हुर्यो १६) फेर; फरक; अंतर १७) एक चर्मवाद्य; मृदंग; पणवानक १९) अयोध्येचा राजा; सीतापती २०) आठवड्यातील कोणताही दिवस २२) थर; दर्जा २४) यांना जनतेचे रक्षक म्हटले जाते २५) अंग मोडून येणे

**उभे शब्द :-** १) शिष्य; विद्यार्थी २) जड नसलेला; कमी दर्जाचा ३) गावंढळ; रानटी ४) वर्षाच्या बोलीने ठेवलेला नोकर -५) - अरण्य - रान, जंगल, कानन- ६) 'शेरिफ'चे मराठी रूप ९) पायापासून 'डोक्यापर्यंत १०) वितरण; वाटणी १२) बरोबर झालेला; स्वभावसिद्ध; उद्देशावाचून १५) राखण; रक्षण; पहारा; रक्षा १६) ठीक; चांगला; योग्य १८) वडिलोपार्जित संपत्तीचा हक्कदार; उत्तराधिकारी २१) आकडा; मांडी २३) लढाई; समर; वाळवंट

### शब्दगंध क्र. ७४६४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चे | त | न | चौ | हा | न | ■ | बे |
| त | ळ | ■ | ■ | त | र | त | री |
| क | प | ब | शी | ■ | म | ग | ज |
| ■ | ट | स | र | ■ | ■ | ■ | ■ |
| अ | ■ | क | ■ | क | स | र | त |
| स | म | र | स | ■ | भा | ज | प |
| मा | ज | ■ | ली | ■ | प | ■ | शी |
| न | ल | द | म | यं | ती | ■ | ल |

### फिल्मीचक्कर क्र. १२४३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि | वा | ना | ■ | डा | ■ | चो | र |
| ल | ■ | ■ | पा | ले | क | र | ■ |
| वा | री | स | ■ | दा | ■ | नी | ल |
| ले | ■ | ज | मा | ना | ■ | ■ | ता |
| दु | ल्ह | न | ■ | ■ | ल | व | ■ |
| ल्ह | ■ | रे | ■ | ■ | ■ | ह | ■ |
| नि | ■ | झू | ठ | बो | ले | कौ | वा |
| या | ■ | ठ | ■ | ल | ■ | न | ट |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : पाणी कितीही खोल असले तरी कमळ नेहमी वरच येतं. तसेच परिस्थिती कितीही वाईट असली तरी जिद्दी माणूस यशस्वी होतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### रेल्वे रुळामध्ये थोडी जागा का सोडलेली असते?

तुम्ही कधी रेल्वे रुळ पाहिला असेल तर लक्षात येईल की दोन रुळांच्या जोडाजवळ थोडीशी फट असते. रेल्वे जाताना 'कटाक-कटाक' आवाज येतो तो याच फटींमुळे. पण रेल्वे अभियंता मुद्दाम ही जागा का सोडतात माहीत आहे का? यामागे आहे विज्ञानाचा एक महत्त्वाचा नियम - प्रसरण आणि आकुंचन. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे उष्णतेमुळे होणारे प्रसरण. प्रत्येक पदार्थ गरम झाला की त्याच्या रेणूंमधील अंतर वाढते आणि तो प्रसरण पावतो. लोखंड हा उष्णतेचा सुवाहक आहे, त्यामुळे तो लवकर गरम होतो. उन्हाळ्यात दुपारी रेल्वे रुळाचे तापमान ६० अंश सेल्सिअस ते ७० अंश सेल्सिअस पर्यंत जाऊ शकते, तर हिवाळ्यात रात्री ते ५ अंश सेल्सिअस पर्यंत खाली येते.

या ६५ अंश सेल्सिअसच्या फरकामुळे १२ मीटर लांबीचा एक रुळ सुमारे ७ ते ८ मिलीमीटर ने वाढतो. भारतात मुंबई-दिल्ली सारख्या लांब पल्ल्याच्या मार्गावर हजारो किलोमीटर रुळ आहे. जर प्रत्येक रुळ ८ मिलीमीटर ने वाढला तर १०० किलोमीटर मध्ये रुळ एकूण ६६ मीटरने वाढेल. जर रुळ सलग जोडले आणि मध्ये जागाच ठेवली नाही तर वाढलेल्या रुळाला जायला जागा मिळणार नाही. त्यामुळे रुळ वाकडा होईल किंवा वर उचलला जाईल. याला 'उन्हाळी पीळ' किंवा 'वाकडणे' म्हणतात. वाकडणे झाले तर भरधाव वेगाने जाणारी गाडी वाकड्या रुळावरून घसरून मोठा अपघात होऊ शकतो. म्हणून प्रत्येक दोन रुळांमध्ये ६ ते ८ मिलीमीटर ची फट मुद्दाम सोडतात. या फटीला 'प्रसरण फट' किंवा 'सांधेपट्टी जोड' म्हणतात. उन्हाळ्यात रुळ वाढला की ही फट भरून निघते. हिवाळ्यात रुळ आकुंचन पावला की फट पुन्हा दिसू लागते. त्यामुळेच हिवाळ्यात रेल्वेचा 'कटाक-कटाक' आवाज जास्त स्पष्ट ऐकू येतो, कारण चाक फटीवर आदळते. पण मग गतिमान रेल्वेच्या रुळावर आवाज का येत नाही? आधुनिक तंत्रज्ञानात आता 'लांब सांधलेला रुळ' वापरतात. यामध्ये २५० मीटर ते १-२ किलोमीटर लांबीचे रुळ सांधून सलग जोडतात.

लांब सांधलेल्या रुळात फट ठेवत नाहीत, पण रुळ काँक्रीटच्या घडवंचीला 'दाब पकड'ने खूप घट्ट बसवतात. घडवंची खाली खडीचा थर असतो जो रुळ सरकू देत नाही. त्यामुळे रुळ वाढूच शकत नाही. सगळा ताण रुळाच्या आत साठतो. हा ताण नियंत्रित ठेवण्यासाठी रुळ जोडताना 'ताणमुक्ती' तापमानाला म्हणजे ३५ अंश सेल्सिअस ते ४० अंश सेल्सिअस ला सांधतात. तरीही लांब सांधलेल्या रुळात दर १-२ किलोमीटरवर 'सरकता प्रसरण सांधा' बसवतात. ते दुर्बिणीसारखे एकमेकात सरकतात आणि रुळाला थोडे प्रसरण होऊ देतात. तसेच उन्हाळ्यात रेल्वे कर्मचारी खास 'उन्हाळी तपासणी फेरी' काढतात.

तापमान ५० अंश सेल्सिअस च्या वर गेले की गाड्यांचा वेग कमी करतात. थोडक्यात, रेल्वे रुळातील छोटीशी फट ही लाखो प्रवाशांच्या सुरक्षेसाठी असते. विज्ञानाचे नियम समजून घेतले की छोटीशी फटसुद्धा मोठा अपघात टाळू शकते. पुढच्या वेळी रेल्वेने प्रवास करताना 'कटाक-कटाक' आवाज आला की आठवा, ही फट आणि अभियंत्याची हुशारी आपल्याला सुरक्षित घरी पोहोचवते.

## खरी लक्ष्मी

एका गावात सासू सुमनबाई आणि सून माधुरी राहत होत्या. सुमनबाईंचा स्वभाव जुन्या वळणाचा. त्यांना वाटायचे सुनांनी फक्त चूल आणि मूल सांभाळावे. माधुरी शिकलेली होती, तिला नोकरी करायची होती. घरात रोज कुरबुरी व्हायच्या. सुमनबाई म्हणायच्या, बायकांनी बाहेर काय कामाला जायचे? घर सांभाळा. माधुरी गप्प बसायची पण मनात दुःखी व्हायची. शेजारच्या देशमुख वहिनींचे घर वेगळे होते. त्यांची सून प्रिया नोकरी करत होती आणि सासू स्वतः तिला बा करून द्यायच्या. देशमुख आजी म्हणायच्या, सून म्हणजे मुलगीच, तिच्या पंखात बळ द्यावे. सुमनबाई हसायच्या, अहो काळ बदलला म्हणून संस्कार सोडायचे का? सुरुवातीला माधुरीला वाटायचे आपले नशीबच खोटे. ात राबायचे, कोणती कौतुकाची थाप नाही. सहा महिन्यांत तिचा चेहरा निस्तेज झाला, आत्मविश्वास हरवला.

प्रियाचे डोळे मात्र रोज चमकायचे कारण घरात तिला साथ होती. मग एक दिवस घरावर संकट आले. सुमनबाईंचा मुलगा म्हणजे माधुरीचा नवरा अपघातात सापडला. नोकरी गेली, हॉस्पिटलचे बिल वाढले. घरातले दागिने विकावे लागले. पैसे संपले आणि सुमनबाई रडू लागल्या. घराची खरी लक्ष्मी माधुरीला शिकवण्याचा उपयोग आता झाला. तिने नोकरीसाठी अर्ज केले. मुलाखती दिल्या. आठ दिवसांत तिला शाळेत शिक्षिकेची नोकरी मिळाली. पहिल्या पगारात तिने नवऱ्याची औषधे आणली. सासूचे डोळे भरून आले. त्याच वेळी देशमुख आजींनीही मदतीचा हात दिला.

सुमनबाई हताशपणे म्हणाल्या की मी चुकले पोरी, मी तुला शिकूनही घरातच बांधून ठेवले. प्रिया मात्र क्षणाचाही विचार न करता धावली. तिने माधुरीला शाळेत स्कूटीवर सोडायला सुरुवात केली, घरचे काम वाटून घेतले. सुमनबाईंनी पहिल्यांदा सुनेच्या हातचा चहा घेतला आणि म्हणाल्या, तूच आज घर सावरलेस. सगळे शेजारी कौतुक करू लागले. पुढच्या महिन्यात सुमनबाई माधुरीकडे गेल्या आणि म्हणाल्या की तुझी ताकद खरी आहे लेकी.

माधुरी फक्त हसली आणि म्हणाली आई, तुम्ही वाईट नाही, पण मुलीला फक्त चूल शिकवू नका, जग शिकवा. कारण संकटाच्या दिवशी सोने कामाला येत नाही, तेव्हा कामाला येते ती स्वतःच्या शिक्षणावर उभी राहण्याची ताकद. हे ऐकून सुमनबाईने ठरवले की आता गल्लीतल्या प्रत्येक पोरीला शिकवणार. माधुरीनेही ठरवले संध्याकाळी मोफत शिकवणी घ्यायची. कारण त्यांना कळले होते की माहेरची साडी एक दिवस फाटते, पण शिक्षणाची शिदोरी आयुष्यभर पुरते. फक्त सून म्हणून राबवून घेणे महत्त्वाचे नाही. खरी लक्ष्मी तीच जी संकटाच्या वेळी स्वतः चे घर आणि सासर दोन्ही सावरू शकते.

तात्पर्य : मुलगी म्हणजे ओझे नाही, ती शिक्षण आणि संधी मिळाल्यावर संपूर्ण घराला आधार देणारी खरी ताकद बनते. संकटाच्या वेळी सोने-नाणे नाही तर शिक्षण आणि स्वावलंबनच कुटुंबाला सावरते.

## आत्मशक्ति



### विलीन होणे

त्याने वेगवेगळ्या घटनांशी कसा सामना करावा व त्यात कसे गुंतून पडू नये ह्याबद्दल माहिती देतो. ह्या पुस्तकाच्या एका भागामध्ये स्पष्ट केले आहे, की आत्म्याने वेगवेगळ्या दृष्यांच्या पाठीमागे चमकणाऱ्या शून्यमय निर्मल ज्योतिशी मन एकाग्र करावे, म्हणजे तो त्या दृष्यांत अडकणार नाही, त्या ज्योतिवर मन एकाग्र केल्यावर आत्मा जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो व आपल्या मूळ स्त्रोताशी जोडला जातो. जर असे झाले नाही तर आत्मा आपल्या केल्या कर्मांचे पुनरावलोकन करतो व आपल्या कर्मानुसार शिक्षा अथवा बक्षीस मिळवितो. आत्मा अण्ड ह्या मंडळाशी मिळत्या जुळत्या मंडळात राहतो किंवा नरक भोगतो. तेव्हा अशा प्रकारे जो आत्मा ज्योतिर्मय मंडळात विलीन झाला नाही, तर तो कर्मानुसार पुनः पृथ्वीवर पुर्नजन्म घेतो. जोपर्यंत कोणी सिद्ध गुरु आत्म्याला ज्योतिमध्ये लीन होण्याचे शिकवीत नाही, जोपर्यंत आत्मा खालील मंडळातून वर उठून निर्वाणपद प्राप्त करीत नाही, तोपर्यंत ह्या चक्रांतून मुक्ती प्राप्त होणे कठीण आहे. ख्रिश्चन आणि यहूदी धर्माचार्यसुद्धा आत्म्याच्या अमरपणाबाबत व दुसऱ्या जगाच्या अस्तित्वाबद्दल सांगतात. अविलाची संत टेरेसा, सीएनाची संत कॅथेरीन, सेंट जॉन ऑफ क्रास इत्यादी लोकांनी असे दिव्य अनुभव घेतले. त्यावरून ह्या जीवनानंतरही पुढे दुसरे जीवन आहे हे सिद्ध होते.

अमेरिकेचे मूळ रहिवाशी परंपरेमधील 'होपी' लोकांच्या विश्वासाप्रमाणे आपल्या प्रिय व्यक्तीच्या मृत्युनंतर ते त्यांच्या आत्म्यांना भेटू शकतात, मात्र त्यासाठी त्यांनी आपले हृदय पवित्र ठेविले पाहिजे आणि दुसऱ्यांशी दयाळू आणि उदार वृत्तीने वागले पाहिजे. जे लोक चांगले वागत नाही त्यांना डाखीनीद्वारे वाईट लोकात नेले जाते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आत्म्याचे मूळ

सुरेश ओबेरॉय आत्म्याचं सामर्थ्य वाढेल पण आपल्या बँक खात्याचं काय ? शिवानीदीदी देणं म्हणजे काही फक्त आर्थिक दान नव्हे. आपण अनेक मार्गांनी देऊ शकतो. आपण हे तपासलं पाहिजे की, आपण जेव्हा भीतीचे आणि स्पर्धेचे संस्कार वापरतो तेव्हा आपल्या आत्म्याच्या शक्तीचं काय होतं? जेव्हा आपण गोष्टी एकमेकांत विभागून घेण्याचा, एकमेकांची काळजी करण्याचा आणि सहकार्य करण्याचा संस्कार वापरतो तेव्हा आपल्याकडे किती शक्ती असते? असं काय आहे जे आपल्याला शक्तिशाली मनुष्य बनवतं ?

सुरेश ओबेरॉय : विभागून घेणं आणि काळजी करणं.

शिवानीदीदी : स्पर्धा आपल्याला कमकुवत बनवते कारण आपण सतत भीती, तणाव आणि चिंतेच्या स्थितीत राहतो. याउलट आपल्याकडे जर सहकार्य करण्याचा आणि इतरांना त्यांच्या प्रवासात प्रोत्साहन देण्याचा संस्कार असेल तर त्याने आपला आत्मा अधिक शक्तिशाली बनेल. आत्म्याचा मूळ गुण टिकून राहणं नाही तर सेवा करणं हा आहे, हे निश्चित करू या.

सुरेश ओबेरॉय : सुंदर!

शिवानीदीदी : जेव्हा आपण टिकून राहण्याच्या स्थितीत गेलो तेव्हा आपण एका ठिकाणी येऊन थांबून राहिलो. पाणी वाहायचं बंद झालं तर काय होईल?

सुरेश ओबेरॉय : त्याचा वास यायला लागेल.

शिवानीदीदी : पाणी वाहतं आणि त्याच्या मार्गात येणाऱ्या प्रत्येकाला जीवन देतं. जर ते वाहायचं थांबलं तर ते साचून राहतं. त्याप्रमाणेच, जर आपला आत्मा प्रवाहित होत राहिला आणि वाटेत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला जोपासत गेला,

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरुजी : देव सगळीकडे असतो, हे पटतं का?

गंप्या : नाही गुरुजी गुरुजी : का रे?

गंप्या : देव सगळीकडे असता तर परीक्षेत कॉपी करताना पकडला गेलो नसतो.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारत व श्रीलंका यांना जोडणारी सामुद्रधुनी कोणती?

– पाल्कची सामुद्रधुनी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### बटाटा

११) पोटात आग होणे, जळजळ वाटणे, आंबट ढेकर येणे अशा विकारांवर कच्च्या बटाट्याचा रस अर्धा कप सकाळ-संध्याकाळ घ्यावा.

१२) उपवासाच्या दिवशी साबुदाण्याऐवजी आहारामध्ये बटाट्याचा वापर करावा. बटाट्याचे वेफर्स, पापड, कीस, भाजी, खीर, पुरी, शिरा असे विविध पदार्थ घरी तयार करून खावेत.

१३) बटाटे वाफवून सुकवून त्याचे पीठ बनवून ठेवावे व उपवासाच्या दिवशी त्या पिठाचे धिरडे, पोळी बनवून खावी.

१४) भाजीमध्ये किंवा सूपमध्ये चुकून मिठाचे प्रमाण जास्त झाले असेल, तर त्याचा खारटपणा कमी करण्यासाठी बटाटा उकडून त्याचे बारीक काप त्यात टाकावेत.

१५) चांदीची भांडी काळसर पडली असतील, तर ती स्वच्छ होण्यासाठी बटाटे उकडलेल्या पाण्यामध्ये ती भांडी ठेवावीत. याने भांडी पांढरीशुभ्र होऊन त्यांची चकाकी वाढेल.

१६) शरीराने कृश असणाऱ्या व्यक्तींनी, तसेच अति श्रम करणाऱ्या व्यक्तींनी, ज्यांची पचनशक्ती चांगली आहे, अशा व्यक्तींनी बटाट्याचा वापर आहारात आवर्जून करावा. याने शरीराचे पोषण होऊन वजन वाढीस लागते.

सावधानता : ज्यांना मधुमेह झालेला आहे, तसेच ज्यांची भूक मंद स्वरूपाची आहे, त्याचबरोबर कायम आजारी असणाऱ्या लोकांनी बटाट्याचा वापर कमी प्रमाणात करावा किंवा बटाटा खाणे टाळावे. तसेच बैठे काम करणाऱ्या व्यक्तींनी व लठ्ठपणा असणाऱ्यांनीही आहारात बटाट्याचा वापर करणे टाळावे व खाल्लाच तर तो कमी प्रमाणात खावा, कारण बटाट्याने वजन वाढते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘गुणवत्तापूर्ण शिक्षणातून समाज घडविण्याचे कार्य रयत करत आहे’

**दादाभाऊ कळमकर यांचे प्रतिपादन; केडगावच्या अंबिका विद्यालयातील अरुणा दरेकर व विलास भोंदे या शिक्षकांची सेवापूर्तीनिमित्त गौरव**



रयत शिक्षण संस्थेच्या केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयात उपशिक्षिका अरुणा तुकाराम दरेकर आणि उपशिक्षक विलास जगन्नाथ भोंदे यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव करण्यात आला.

नगर – रयत शिक्षण संस्था ही केवळ शैक्षणिक संस्था नसून समाज परिवर्तनाची चळवळ आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांवर आधारित शिक्षणपद्धतीमुळे ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली. आज संस्थेने भौतिक सुविधांसोबतच गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या क्षेत्रातही उल्लेखनीय प्रगती केली असून, त्यामागे शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अध्यक्षीय भाषणात दादाभाऊ कळमकर यांनी स्पष्ट केले.

रयत शिक्षण संस्थेच्या केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयात उपशिक्षिका अरुणा तुकाराम दरेकर आणि उपशिक्षक विलास जगन्नाथ भोंदे यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव करण्यात आला. अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या या दोन्ही शिक्षकांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्कारक्षम कार्याचा यावेळी मान्यवरांनी गौरव करत त्यांच्या समर्पित सेवेचे कौतुक केले.

रयत शिक्षण संस्थेचे माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव शिवाजीराव भोर, अंबादास गारुडकर, विठ्ठलराव दरेकर, ज्ञानदेव पांडुळे, कुंडलिकराव दरेकर, अर्जुन पोकळे, अशोकराव बाबर, अनिल साळुंखे, शौकतबाई तांबोळी, अलकाताई अनभुले, किसन सातपुते, महेश गुंड, भास्करराव महाडिक, पोपट शिंगवी, प्रशांत कोतकर, गोविंद कोतकर, गंगाधर लोंढे, कृष्णाजी थोरात, रावसाहेब सातपुते, रामदास येवले, रघुनाथराव लोंढे, मधुकर देशपांडे, अभयकुमार चव्हाण यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यालय, नातेवाईक, सहकारी शिक्षक आणि मान्यवरांच्या हस्ते अरुणा दरेकर व विलास भोंदे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या प्रदीर्घ सेवेला दाद दिली.

प्रास्ताविकात प्राचार्य नवनाथ बोडखे यांनी दोन्ही शिक्षकांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, शिक्षक हा समाज घडविणारा शिल्पकार असतो. अरुणा दरेकर आणि विलास भोंदे यांनी आपल्या सेवाकाळात निष्ठा, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पणातून अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले. त्यांचा हा गौरव म्हणजे संपूर्ण शिक्षक समाजाचा सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले.

बाबासाहेब भोस यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, रयतमधील शिक्षकांनी समाजाभिमुख शिक्षणाची परंपरा जोपासली आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच संस्थेच्या विकासासाठीही रयत सेवकांनी योगदान दिले आहे. सेवकांच्या पगारातील एक टक्का निधीतून उभारण्यात आलेल्या शैक्षणिक संकुलांच्या इमारती ही संस्थेच्या सामूहिक कार्यसंस्कृतीची साक्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव शिवाजीराव भोर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गुणवत्ताधारक शिक्षकांच्या मेहनतीतूनच देशाची भावी पिढी घडते. शिक्षक निवृत्त होतो, मात्र त्याने दिलेले संस्कार आणि घडविलेले विद्यार्थी समाजात कायम कार्यरत राहतात. त्यामुळे अशा समर्पित शिक्षकांचा निरोप हा भावनिक क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.


सत्काराला उत्तर देताना अरुणा दरेकर यांनी वाळकी आणि केडगाव येथील अंबिका विद्यालयातील आपल्या सेवाकाळातील अनेक आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांचे प्रेम, सहकाऱ्यांचे सहकार्य आणि संस्थेने दिलेली कार्यसंस्कृती ही आयुष्यभर जपण्यासारखी असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

विलास जगन्नाथ भोंदे यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळणे हे आपले भाग्य आहे. शिक्षणाची आवड आणि विद्यार्थ्यांना घडविण्याची प्रेरणा यामुळे सेवाकाळ कधी संपला हे समजलेच नाही. आज अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात यशस्वी झालेले पाहून समाधान वाटते, असे सांगताना ते भावूक झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री भोस आणि स्वाती औटी यांनी केले. उपमुख्याध्यापक सुखदेव मुरूमकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिताराम जपकर, संदीप गाडीलकर, अंबादास पारधे, प्रशांत शेळके, स्वाती चोभे, प्राजक्ता दामगुडे आणि विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## भावविण वांझे पाठांतर




विद्येला हवी व्यहाराची जोड. येथे नको कसलीही तडजोड. पण पुष्कळांची याबाबतीत चालते धरसोड. मग नशिबी येते सुखाची तोडफोड. तुकाराम महाराज म्हणतात, व्यर्थ भराभर केले पाठांतर । जोवरी व्यवहार शुद्ध नाही ।। घोडे काय थोडे वागविते । ओझे भावाविण वांझे पाठांतर ।।’

माणसांशी कसे वागावे? आपले विचार आणि आचार यापायी कुणालाही दुःख न व्हावे, असे वर्तन ठेवावे. एरव्ही नुसती पुस्तकी विद्या काय कामाची ? विद्या तोंडपाठ, व्यवहार मात्र सपाट. मग काय कामाचा तो पदव्यांचा थाट. घोड्याच्या पाठीवर साखरेच्या गोण्या. पण उपयोग काय घोड्याला ? त्याच्या नशिबी गवताच्याच पेंढ्या. व्यवहारोपयोगी असा विद्येचा आशय समजणे, त्यामुळेच यशस्वी होणे. महाभारत म्हणते, या वेद वेदान्त सवैद वैद्य, सत्ये स्थितो यस्तु स वेद वैद्यम।।

विद्येचे विलक्षणत्व लक्षात आले पाहिजे. केवळ केली वेदांची घोकंपट्टी की व्यवहारात निघते खरडपट्टी. हट्टी माणसे नाही घेत पण हे लक्षात मग कृष्ण पक्षात जसा चंद्र होतो रोड, तशी यांची भाग्यदशादेखील. म्हणते, नको हा पुस्तकी किडा याला त्वरित सोडा. पण जो जाणतो विद्येचे मर्म, त्याचे फळते कर्म. माधवनाथ म्हणतात, बगलेत ग्रंथ विशाल खांद्यावर भरजरी शाल, कशी रुबाबदार चाल, व्यवहार मात्र बेताल ।।

पंडितंमन्य, म्हणजे स्वतःला पंडित मानणारे, बगलेत विशाल ग्रंथ बाळगणारे भरजरी शाल खांद्यावर घेणारे, पोकळ डौलात सभांतून मिरवणारे, व्यवहारात पडतात उघडे. ज्ञानातील मर्माचे त्यांना दर्शनच न घडे. विद्येचा व्यवहाराशी घालावा मेळ, कारण जीवन हा नव्हे पोरखेळ.

एकदा मी बसने प्रवास करीत होतो. माझ्या शेजारी दोन जाडजूड इसम बसले होते. त्यांच्याजवळ नियमांचे थोरांड पुस्तक होते. बस केवळ नियमित थांब्यावरच थांबेल. प्रवाशांनी मध्येच उतरण्याची घाई करू नये. चालत्या बसमधून उतरणे धोक्याचे वगै रे नियम ते जोरजोराने वाचत होते. गाव लागताच पूर्वी एक थांबा अस्तित्वात होता, पण आता तो रद्द झाला होता. त्यामुळे तेथे बस थांबणे बंद झाले होते. ती एकदम स्थानकावरच जाऊन थांबायची. त्या दिवशी मात्र ती त्या रद्द झालेल्या थांब्यावर थांबली. बरेचसे प्रवाशी उतरण्यासाठी बसच्या दाराशी गेले, तर ते दोन जाडजूड इसम दारात बाटलीला बूच लावावे तसे गच्च उभे. कुणालाही उतरणे अशक्य. ते वाहकाशी वाद घालण्यात दंग. ते म्हणत होते, थांबा नसताना बस गावात शिरताच तिथे का थांबली ?

वाहक म्हणाला, काही लोकांनी विनंती केली. हा व्यवहार आहे. त्यांची विनंती मी मानली. तुमचं काय गेलं?

ते म्हणाले, आम्हालाही तिथेच उतरायचं होतं. पण ते उतरले नव्हते. कारण पुस्तकी नियमांमध्ये ते बसत नव्हते.

न जाणे व्यवहार । व्यर्थ मग भार । पुस्तकांचा।।

**– किशोर गांधी**



**’तिब्बती बौद्ध धर्माच्या ’द्रुक्पा काग्यु’ परंपरेतील लामा द्रुक्पा थुक्से रिन्पोछे यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट**

तिब्बती बौद्ध धर्माच्या ’द्रुक्पा काग्यु’ परंपरेतील एक अत्यंत आदरणीय आणि उच्च पदस्थ लामा (आध्यात्मिक गुरु) द्रुक्पा थुक्से रिन्पोछे हे लेह लडाख येथील महाबोधी इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटर येथे आयोजित योग महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात आले असता अहिल्यानगर येथील सोनई सेवाकेंद्राच्या प्रमुख बी के उषा दीदी यांनी त्यांची भेट घेऊन प्रेरणादायी वक्त्या बीके शिवानी यांचे असीम आनंद की ओर हे पुस्तक भेट दिले. यावेळी बीके डॉ. दीपक हरके, मिस इंडिया डॅा इशा अगरवाल उपस्थित होते. यावेळी महाबोधि इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटर चे संस्थापक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बौद्ध भिक्षू, शांततादूत आणि समाजसुधारक वेन. भिक्खू संघसेना उपस्थित होते.

# अनामप्रेमच्या चिमुकल्यांसमवेत आयएमएचा डॉक्टर डे साजरा

नगर – डॉक्टर डे निमित्त इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), अहिल्यानगर शाखेच्या वतीने गांधी मैदान येथील अनामप्रेम संस्थेत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. संस्थेतील मुला–मुलींची आरोग्य तपासणी करून त्यांच्यासमवेत डॉक्टर डे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉक्टरांनी मुलांशी संवाद साधत त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शनही केले.

कार्यक्रमास आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी, सचिव डॉ. अमित करडे, माझी अध्यक्ष डॉ. चंद्रवदन मिश्रा, डॉ. मिलिंद पोळ, डॉ. नरेंद्र वानखडे, डॉ. सचिन पांडुळे, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. अतुल खालकर, डॉ. अविनाश गाडेकर, डॉ. महेश घोडके, डॉ. रोहित थोरात, डॉ. कस्तुरी कुऱ्हाडे, डॉ. क्षितिज तांबोळी, डॉ. अर्चनासिंग तांबोळी, डॉ. अनिलकुमार सिंग, डॉ. सत्त्व दराडे, तसेच अनामप्रेम संस्थेचे डॉ. मराठे मॅडम, तसेच आयएमए चे व्यवस्थापक विशाल येमुल यांच्यासह आयएमएचे पदाधिकारी, सदस्य, डॉक्टर उपस्थित होते.

**टाकाऊ वस्तू पासून मुलांनी साकारलेल्या कलाकृती पाहून डॉक्टर भारावले**



डॉक्टर डे निमित्त इंडियन मेडिकल असोसिएशन, अहिल्यानगर शाखेच्यावतीने अनामप्रेम संस्थेत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिरात तपासणी करताना आयएमएचे अध्यक्ष डॉ.धनंजय कुलकर्णी. (छाया – समीर मन्यार)

यावेळी अध्यक्ष डॉ. कुलकर्णी म्हणाले, आयएमएच्या वतीने दरवर्षी डॉक्टर डे समाजोपयोगी उपक्रमातून साजरा केला जातो. अनामप्रेमसारख्या संस्थेतील वंचित घटकांना समाजाच्या आधाराची गरज आहे. येथील मुला–मुलींनी टाकाऊ वस्तूंमधून तयार केलेल्या आकर्षक कलाकृती त्यांच्या जिद्दीचे आणि सर्जनशीलतेचे प्रतीक आहेत. या वस्तूंची खरेदी करून त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला देणे ही समाजाची जबाबदारी आहे. भविष्यात आयएमएच्या विविध कार्यक्रमांमध्ये संस्थेतील उत्पादने खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

ज्येष्ठ तज्ज्ञ डॉ. नरेंद्र वानखेडे म्हणाले गेल्या चार–पाच वर्षांपासून आयएमएच्या वतीने डॉक्टर डे अनामप्रेम संस्थेत साजरा केला जातो. यानिमित्त संस्थेतील सर्व मुलांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार केले जातात. सामाजिक बांधिलकी जपत समाजातील तळागाळातील घटकांच्या पाठीशी सदैव उभी राहील असे ते म्हणाले.

**जिद्द, कष्ट आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी आदर्श**

अनामप्रेम संस्थेतील मुला–मुली आहेत. टाकाऊ वस्तूंमधून तयार केलेल्या आकर्षक कलाकृती पाहून उपस्थित डॉक्टर भारावून गेले. अत्यंत कठीण परिस्थितीतही चेहऱ्यावर आनंद ठेवत स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणाऱ्या या मुलांचा आदर्श समाजाने घेतला पाहिजे. त्यांनी बनविलेल्या हस्तकलेच्या वस्तू खरेदी करून त्यांच्या कष्टाचे चीज करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यावी, असे आवाहन आयएमएच्या वतीने करण्यात आले.

# शिक्षणासोबत संस्कारही तितकेच महत्त्वाचे; विद्यार्थ्यांनी पालक व देशाचे नाव उज्ज्वल करावे

**महापौर ज्योती गाडे यांचे प्रतिपादन; पद्मशाली स्नेहिता संगमतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

नगर – विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या शर्यतीत न धावता शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव जोपासली पाहिजे. शाळा व महाविद्यालयात नियमित उपस्थित राहून शिक्षण घेतल्यास पालकांवरील आर्थिक भारही कमी होतो. विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने पालकांसह देशाचेही नाव उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन महापौर सौ. ज्योती गाडे यांनी केले.

पद्मशाली स्नेहिता संगमच्या वतीने आयोजित दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या सत्कार समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. गेल्या सलग २६ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या उपक्रमामुळे समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.





पद्मशाली स्नेहिता संगमच्या वतीने आयोजित दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या महापौर सौ. ज्योतीताई गाडे. शेजारील छायाचित्रात कार्यक्रमास लाभलेली महिलांची उपस्थिती दिसत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहर बँकेचे संचालक दत्तात्रय रासकोंडा होते. यावेळी उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, भाजप गटनेते नगरसेविका शारदाताई ढवण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या सौ. शितल अजय ढोणे तसेच सक्सेस सायन्स अ‍ॅकॅडमीचे संचालक प्रा. इंजी. सुजित वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी आजच्या बदलत्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे महत्त्व विशद केले. काळानुरूप ज्ञान संपादन करून स्वतःला सक्षम व स्पर्धात्मक बनविण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

भाजप गटनेते नगरसेविका शारदाताई ढवण यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे सांगितले. शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत होतो. स्वातंत्र्याच्या मर्यादा ओळखून जबाबदारीने वागावे आणि आई–वडिलांचे नाव मोठे करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या सौ. शितल ढोणे यांनी पद्मशाली स्नेहिता संगमच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी केवळ गुण मिळविण्यावर भर न देता समाजकार्य, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासालाही तितकेच महत्त्व द्यावे. चांगले नागरिक घडविण्यात अशा उपक्रमांची महत्त्वाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते प्रा. इंजी. सुजित वाघ यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना प्रत्येकाने आपले ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असा सल्ला दिला. आत्मविश्वास हीच यशाची खरी गुरुकिल्ली असून गरिबी कधीही शिक्षणातील अडथळा ठरत नाही. जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आपल्या संस्थेत प्रवेश घेताना फीमध्ये २५ टक्के सवलत जाहीर केली.

प्रास्ताविक पद्मशाली स्नेहिता संगमच्या अध्यक्षा डॉ. रत्नाताई बल्लाळ यांनी केले. त्यांनी संस्थेच्या २६ वर्षांच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेतला.

उपाध्यक्षा रेखा वड्डेपल्ली व सचिव सपना छिंदम यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

सूत्रसंचालन सरोजनी रच्चा यांनी केले. आभार प्रदर्शन सविता कोटा यांनी केले.

याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचाही विशेष गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून पाच सुवर्णपदके पटकावणारे देवदत्त गुंडू यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सीए परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या आदित्य संजय खरदास यांचाही गौरव करण्यात आला.

जर्मन भाषा शिक्षिका म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पद्मा पुलगम तसेच मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या दिव्या बोज्ञा यांचा सन्मान करण्यात आला.

सी. व्ही. रमण बाल वैज्ञानिक परीक्षेत राज्यात तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या श्लोक दोमल याचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात दहावी व बारावीतील एकूण ६० गुणवंत विद्यार्थी–विद्यार्थिनींचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमोद गुंडू, गुंडू क्रिएशन, गुंडू अम्मा साडी, हॉबी टेलर, सविता येनगंदुल, आनंद येमुल, सीए सुनंदा रच्चा, रेणुका खरदास, क्रांती असंघटित कामगार संघटनेच्या अध्यक्षा अनिता कोंडा तसेच प्रमिला चिलका यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खजिनदार नीता बुरा, सविता एक्कलदेवी, विजया गुंडू, साधना कोल्पेक, लक्ष्मी गुंडू, सोनी लयचेट्टी, रोहिणी पागा, पुनम वन्नम, सविता येनगंदुल यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

# कवयित्री सुजाता पुरी यांना पीएच.डी.



डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएचडी पदवी मिळविल्याबद्दल श्रीमती सुजाता पुरी यांचा सत्कार करताना मार्गदर्शक गाईड डॉ.दिलीप म्हस्के व मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ.लक्ष्मण साळोक.

नगर – जिल्हा परिषद मराठी शाळा, पिंपळगाव माळवीच्या उपाध्यापिका, कवयित्री व लेखिका श्रीमती सुजाता नवनाथ पुरी यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे पीएच डी पदवी प्रदान करण्यात आली आहे.

दशनाम गोसावी जातीचे सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक अध्ययन, विशेष संदर्भाने अहमदनगर जिल्हा हा प्रबंध त्यांनी विद्यापीठास सादर केला होता. अंबाजोगाई महिला महाविद्यालयाचे डॉ. दिलीप म्हस्के हे त्यांचे मार्गदर्शक गाईड होते तसेच मराठवाडा विद्यापीठातील मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मण साळोक यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रबंध त्यांनी सादर केला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या विद्यमान महिला शिक्षिकांमधील पीएचडी प्राप्त करणाऱ्या संपूर्ण जिल्ह्यातील डॉ. पुरी या एकमेव शिक्षिका आहेत.

श्रीमती पुरी यांचे ऋतू अंतरीचे हा काव्यसंग्रह व वाटेवरच्या मशाली हा लेख संग्रह प्रसिद्ध आहे तसेच अखिल भारतीय मराठी कवी संमेलनामध्ये सलग चार वर्षे त्यांना आपली कविता सादर करण्याचा मान मिळालेला आहे. हा मान मिळणाऱ्या त्या जिल्ह्यातील एकमेव कवयित्री आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल जिल्हयातील शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# जनशक्ती कॉलेजमध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत; करिअर, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा दिला मंत्र



नगर – जनशक्ती ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर येथे अकरावीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात झाला. विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासह विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विशाल पांडे (प्राचार्य, एन. एन. सत्ता कॉलेज ऑफ फार्मसी) होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य जगन्नाथ बोडके (राष्ट्रीय पाठशाळा हायस्कूल, अहिल्यानगर) तसेच यश फाउंडेशनचे संस्थापक संजय डोंगरे उपस्थित होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य अशोक कदम यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा आणि कॅम्पसविषयी माहिती दिली.

डॉ. विशाल पांडे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा सखोल अभ्यास करून एमबीबीएस, आयआयटीसारख्या प्रतिष्ठित क्षेत्रांमध्ये प्रवेश मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले.

प्राचार्य जगन्नाथ बोडके यांनी नवीन शैक्षणिक धोरण, नियमित उपस्थितीचे महत्त्व आणि महाविद्यालयीन शिक्षणाची गरज यावर मार्गदर्शन केले. शासनाकडून नियमित हजेरीवर विशेष भर दिला जात असून, विद्यार्थ्यांनी केवळ खासगी क्लासेसवर अवलंबून न राहता नियमित महाविद्यालयात उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे संजय डोंगरे तसेच महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. विकास गवळी यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना उपप्राचार्य अशोक कदम यांनी केली.

सूत्रसंचालन विमल आहेरे यांनी केले. आनंद मुथा यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. सोनाली सटाळे, सौ. हर्षदा ठाणगे, राहुल जाधव, सौ. सोनाली पिसे, सौ. आरती गायकवाड, सतीश कीर्तने आणि श्रीमती मंगल राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे, जि. प. सदस्य हर्षदाताई काकडे, संस्थेचे विश्वस्त पृथ्वीसिंग काकडे, महाविद्यालयाच्या वित्त विभाग प्रमुख सौ. भाग्यश्री काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण बिटाळ यांनी शुभेच्छा दिल्या.




'सजग विद्यार्थी ग्राहक प्रबोधन' या अंतर्गत आयोजित कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर आदी.

# दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी ग्राहक पंचायतीचे कार्य

## गजेंद्र क्षीरसागर यांचे प्रतिपादन; 'सजग विद्यार्थी ग्राहक प्रबोधन' अभियान

नगर – ग्राहक पंचायत महाराष्ट्र ही संघटना तंत्रज्ञानाचा, सेवांचा व सुविधांचा वापर योग्य रीतीने व्हावा यासाठी प्रयत्न करते. एका अर्थाने दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी ग्राहकांना जागृत करणे, त्यांना त्यांच्या न्याय हक्काची जाणीव करून देणे व तरीही समस्या उद्भवलीच तर त्यातून सुटकेचा मार्गही सुचवते असे प्रतिपादन ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांनी केले.

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन संचालित प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, कामरगाव व ग्राहक पंचायत महाराष्ट्रची अहिल्यानगर जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'सजग विद्यार्थी ग्राहक प्रबोधन' या अंतर्गत आयोजित कार्यक्रमात क्षीरसागर बोलत होते. याप्रसंगी प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे विभाग प्रमुख दिवाकर भोयर, ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, जिल्हा सचिव ॲड. सिद्धार्थ वाघमारे, सहसचिव संजय जोशी, अजित कटारिया व डॉ.कविता शिंदे तसेच प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचा सर्व शिक्षक व सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

क्षीरसागर पुढे म्हणाले, डिजिटल युगात दैनंदिन जीवन गतिमान झाले आहे. तंत्रज्ञानाचा वापर योग्य रीतीने केल्यास ते जीवन सुसह्य करते मात्र गैरवापर केल्यास त्याच तंत्रज्ञानामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी ग्राहकांच्या न्याय हक्कासाठी ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांनी स्थापन केलेली ग्राहक पंचायत ही ग्राहकांसाठी ग्राहकांनीच उभी केलेली चळवळ धावून येते.

विद्यार्थीदशेपासूनच ग्राहक म्हणजे काय ? ग्राहकांचे हक्क काय? कर्तव्य काय? याची माहिती व्हावी यासाठी राज्यभर 'सजग ग्राहक विद्यार्थी प्रबोधन' हे अभियान राबवले जाते. ग्राहकाला त्याच्या हक्काची जाणीव असेल व कर्तव्याची त्याला जोड असेल तर फसवणुकीचे व लुबाडणूकीचे प्रसंग येणारच नाही. कोणतीही कृती प्रामाणिकपणे आणि नियमांचे अनुकरण करून करणे हा कर्म सिद्धांत सोप्या भाषेत क्षीरसागर यांनी समजून सांगितला.

याप्रसंगी बोलताना ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार म्हणाले, उपलब्ध साधन सामग्रीचा संयमाने वापर केल्यास असे प्रश्न आपोआप सुटू शकतात. विद्यार्थ्यांच्या जीवनात उपलब्ध नैसर्गिक संपदा अर्थात पाणी, वीज, इंधन, अन्न, शालेय साहित्य याचा वापर संयमाने केल्यास स्वतःच्या कुटुंबासह राष्ट्राचे कुटुंबाचे हीत आपोआप साधले जाईल.

याप्रसंगी ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव व योग शिक्षक सिद्धार्थ वाघमारे यांनी जागतिक योग दिनानिमित्त निवडक आसने फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांना शिकवली व करून घेतली. त्यांनी जागतिक योग दिनाचे महत्त्व व त्याचा भावी जीवनासाठी होणारा लाभ याबाबत माहिती दिली.

दिवाकर भोयर यांनी संस्थेविषयी व संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीबाबत सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी संजय जोशी व अजित कटारिया यांनीही मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन ज्ञानेश्वर वायबासे यांनी केले.

प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे केंद्रप्रमुख औदुंबर मांगले, प्रदीप बांगर, प्रथम फाउंडेशनचे प्रशिक्षक रवी फसले, अमर गरड, ओंकार वाडकर, सुरज मोरे, माया ओहोळ, विनोद शिंगाडे, संतोष शिरोळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वृक्षारोपण करून झाली.

# पिण्याचे पाणी व ड्रेनेजच्या समस्येची मनपा आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी

## संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित दुरुस्तीचे आदेश; स्वप्निल शिंदे यांच्या निवेदनाची तात्काळ दखल



कोठी परिसरातील गुलाबसिंह कंपाऊंड येथील नागरिकांना भेडसावत असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या व ड्रेनेजच्या समस्येची दखल घेत अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.

नगर – कोठी परिसरातील गुलाबसिंह कंपाऊंड येथील नागरिकांना भेडसावत असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या व ड्रेनेजच्या समस्येची दखल घेत अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. स्वप्निल शिंदे यांनी दिलेल्या निवेदनानंतर आयुक्तांनी तातडीने घटनास्थळी भेट देत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कामे त्वरित पूर्ण करण्याचे आदेश दिले.

गुलाबसिंह कंपाऊंड परिसरात नगर–पुणे महामार्गावरील पिण्याच्या पाण्याची मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे अनेक दिवसांपासून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होत नव्हता. नागरिकांकडून नियमित पाणीपट्टी भरली जात असतानाही पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने परिसरात तीव्र नाराजी होती. याशिवाय ड्रेनेज लाईन तुंबल्यामुळे अस्वच्छता व दुर्गंधीची समस्या निर्माण झाली होती. या दोन्ही समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी स्वप्निल शिंदे यांनी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत आयुक्तांनी स्वतः गुलाबसिंह कंपाऊंड परिसरात भेट देऊन पाणीपुरवठा लाईन तसेच ड्रेनेज व्यवस्थेची पाहणी केली.

पाहणीनंतर आयुक्त यशवंत डांगे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना फुटलेली जलवाहिनी तातडीने दुरुस्त करून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याचे तसेच ड्रेनेज लाईनची साफसफाई करून नागरिकांची गैरसोय दूर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

यावेळी स्वप्निल शिंदे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# 'मार्कंडेय'च्या मुख्याध्यापिका विद्या दगडे यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत : पद्मश्री पोपटराव पवार




मार्कंडेय विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना पद्मश्री पोपटराव पवार आदी.

नगर – मार्कंडेय विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे (वाघमारे) यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत आहे. आपल्या ३१ वर्षांच्या सेवेत त्यांनी शेकडो विद्यार्थी घडवले, असे गौरवोद्गार आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष, पद्मश्री पोपटराव पवार यांनी काढले. निवृत्तीनंतर त्यांनी आता पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील अहिल्यानगर ग्रीन सिटी उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

मार्कंडेय विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या.सेवापूर्ती निमीत्त त्यांचा ३० जून रोजी पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, शिक्षक नेते रा.या.औटी, नगरसेवक निखिल वारे, बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे, पुष्कर कुलकर्णी, रोहन सानप, मनोज दुल्लम, विनोद म्याना, मल्हार गंधे, संदीप कर्डीले, पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे, पद्मशाली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक सब्बन, शंकर सामलेटरी, विनायक गुडेवार, बाळकृष्ण सिद्दम, भिमराज कोडम, शरद क्यादर, स्नेहीता संगम, डॉ. बब्लाळ, नूर मोहम्मद पठाण, मनपा शिक्षण विभागाचे कुटे, सुर्यकांत दगडे, सुनील चौधरी, स्वप्नील दगडे, संकेत दगडे, निखिल दगडे यावेळी उपस्थित होते.

पद्मश्री पवार म्हणाले, सर्वच वक्त्यांनी मुख्याध्यापिका दगडे यांच्या कामाचा आढावा घेताना त्यांच्या विशिष्ट कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला. त्यावरून त्यांच्या कामातील शिस्त, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी असणारी तळमळ, त्यासाठी त्यांनी राबवलेले कल्पक उपक्रम आणि मुख्याध्यापक म्हणून काम करताना त्यांच्यात असलेले नेतृत्वगुण याची ठळकपणे कल्पना येते.एकूणच त्यांचे शैक्षणिक काम आदर्शवत होते, असे पवार म्हणाले.

शिक्षणाधिकारी भास्कर पाटील म्हणाले की, मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी ३१ वर्षांच्या सेवेत २९ वर्षे मुख्याध्यापिका पदावर काम केले आहे. या काळात त्यांनी विशेषतः प्राथमिक वर्गातील विद्यार्थी घडवताना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्यावर उत्तम संस्कार व्हावेत यासाठी विविध उपक्रम राबवले. व्यक्तीमत्व विकासासाठी प्रयत्न केले. त्यातून सुसंस्कारित पिढी घडली. निवृत्तीनंतर त्यांनी आता बालसंस्कार वर्ग सुरू करावेत असे आवाहन शिक्षणाधिकारी पाटील यांनी केले. सध्याच्या काळात बालसंस्कार वर्गांची नितांत आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शशिकांत गोरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन गितांजली काकडे व सुचिता भावसार यांनी केले तर मिनाक्षी बिंगेवार यांनी आभार मानले.

### ग्रीन सिटी उपक्रमात सहभाग घ्यावा

उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर ग्रीन सिटी उपक्रम राबवण्यात येत आहे. जागतिक तापमान वाढीच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम महत्वाचा आहे. हा उपक्रम केवळ उपमहापौर जाधव किंवा महानगरपालिकेचा नाही तर शहरातील नागरिकांचा आहे. सर्वांचा उस्फुर्त सहभाग महत्त्वाचा आहे. मुख्याध्यापिका विद्या दगडे यांनी किमान १५१ झाडे लाऊन त्यांचे संवर्धन करावे. त्यासाठी त्यांना त्यांच्या सहकारी शिक्षकांनी सहकार्य करावे. या उपक्रमातील शिक्षकांचे सहकार्य हे त्यांच्यासाठी निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा ठरतील, असे आवाहन पद्मश्री पोपटराव पवार यांनी यावेळी केले.

# रोटरी क्लब ऑफ डिग्निटीचा वृक्षारोपणाने सामाजिक उपक्रमांना प्रारंभ

## 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे....' या अभंगाचे स्मरण करत पर्यावरण संतुलनाचा निश्चय



रोटरी क्लब ऑफ डिग्निटीचे अध्यक्ष ॲड.अभिषेक भगत व सचिव डॉ.वैशाली पाटील यांच्या सामाजिक कार्याचा शुभारंभ वृक्षारोपण करून झाला. यावेळी सिए. अजय गांधी आणि डॉ. विवेक देशपांडे यांच्या हस्ते वृक्षांची लागवड करण्यात आली. समवेत ॲड.अभय राजे, डॉ.सोनल भालसिंग, उज्वला राजे, प्रदीप चोभे, संदीप घोडके आदींसह सदस्य,

नगर – सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी अहिल्यानगरच्या रोटरी क्लब ऑफ डिग्निटीच्या २०२६–२७ च्या नूतन पदाधिकाऱ्यांनी वृक्षारोपण करून आपल्या सामाजिक कार्याचा शुभारंभ केला. क्लबचे नूतन अध्यक्ष ॲड. अभिषेक भगत आणि सेक्रेटरी डॉ. वैशाली पाटील यांच्या कार्यारंभा निमित्ताने चार्टर्ड अकाउंटंट अजय गांधी आणि डॉ. विवेक देशपांडे यांच्या हस्ते बहुपयोगी वृक्षांची लागवड करण्यात आली. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्मरण करत उपस्थितांनी पर्यावरण संतुलनासाठी झाडांच्या संगोपनाचा निश्चय केला.

या कार्यक्रमास रोटरी क्लब डिग्निटीचे वरिष्ठ सदस्य ॲड.अभय राजे, माजी अध्यक्ष डॉ.सोनल भालसिंग, खजिनदार अनिल बिहानी, माजी सेक्रेटरी उज्वला राजे, डॉ.प्रदीप चोभे, प्रोजेक्ट हेड संदीप घोडके, राहुल जामगावकर, ॲड. युवराज पाटील, कविता भगत, डॉ अजिता चोभे, सिमा भालसिंग, डॉ.प्रिती देशमुख, रवींद्र चोभे, ॲड.श्वेता मुळे, डॉ. प्रशांत निक्रड, साबिर सय्यद आदींसह सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉक्टर व सिए डे साजरा करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

सिए अजय गांधी म्हणाले, असंतुलित पर्यावरणामुळे सर्वत्र ग्लोबल वॉर्मिंग वाढले आहे. याचा मोठा दुष्परिणाम भारतासह अनेक देशांमध्ये भासत आहेत. अशा परिस्थितीत नगरच्या रोटरी क्लब डिग्निटीने वृक्षारोपण व संगोपनासाठी घेतलेला पुढाकार स्वागतार्ह असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ.विवेक देशपांडे म्हणाले, रोटरी क्लबचे सामाजिक कार्य खूप कौतुकास्पद आहे. गरजूंना मदतीचा हात देत आहे. हे काम असेच निरंतर चालू ठेवून थॅलेसेमियाच्या रुग्णांच्या उपचारासाठी रोटरी क्लबने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात ॲड.अभिषेक भगत यांनी रोटरी क्लब ऑफ डिग्निटीच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देत सांगितले की, हेल्थ व वेल्थ सांभाळणारे डॉक्टर व चार्टर्ड अकाउंटंट यांचे समाजाप्रती असलेल्या मोठ्या योगदाना प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा विशेष सन्मान केला आहे. भविष्यात रोटरी क्लब ऑफ डिग्निटीच्या माध्यमातून समाजोपयोगी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि पर्यावरणविषयक असे विविध उपक्रम राबविण्याचा निर्धारही यावेळी त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन उज्वला राजे यांनी केले. क्लबच्या सेक्रेटरी डॉ.वैशाली पाटील यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरमध्ये ४ जुलै रोजी बालकांसाठी मोफत हृदय रोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

## गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा : विक्रम राठोड



नगर – राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत ० ते १८ वर्षांतील बालकांच्या हृदयविकाराचे निदान, उपचार आणि मोफत हृदय शस्त्रक्रियेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील लहान मुलांसाठी मोफत २डी–इको तपासणी आणि हृदय शस्त्रक्रिया शिबीर ४ जुलै रोजी आयोजित केले आहे. या उपक्रमांतर्गत आजवर विविध शिबिरांच्या माध्यमातून १० हजार पेक्षा जास्त बालकांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

हे शिबीर शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, ज्युपिटर हॉस्पिटल (पुणे), आरोग्य दूत फाउंडेशन आणि शिवसेना अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले जात आहे. जिल्ह्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख प्रशांत साळुंके यांनी दिलेल्या माहितीनुसार वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे आणि कार्याध्यक्ष रामहरी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरामध्ये प्रख्यात तज्ज्ञ डॉक्टर राहुल सराफ आणि डॉक्टर अभिजीत नाईक हे रुग्णांची तपासणी करणार आहेत.

हे मोफत आरोग्य शिबीर पत्रकार चौक येथील जिल्हा रुग्णालय (सिव्हील हॉस्पिटल), अहिल्यानगर येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहील. या तपासणी शिबिरादरम्यान ज्या बालकांना पुढील शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, त्यांच्यावर ज्युपिटर हॉस्पिटल, पुणे येथे संपूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. या सुवर्णसंधीचा जिल्ह्यातील गरजू आणि गरीब रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन युवासेना सहसचिव विक्रम अनिलभैय्या राठोड यांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहिती किंवा संपर्कासाठी नागरिकांनी शिवालय, नेता सुभाष चौक, चितळे रोड, अहिल्यानगर येथील कार्यालयाशी किंवा ९४२२२२१६०८, ८००७७७७७७१, ८३२९५२०८६५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# बालक मंदिर महिला मंडळ शाळेत डॉक्टर, सीए व महाराष्ट्र कृषीदिन साजरा



बालक मंदिर महिला मंडळ शाळेत डॉक्टर दिन, सीए दिन व महाराष्ट्र कृषीदिन यांचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – बालक मंदिर महिला मंडळ शाळेत डॉक्टर दिन, सीए दिन व महाराष्ट्र कृषीदिन यांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुर्वेदाचार्य डॉ. सौ. अर्चना गिरगे होत्या. तसेच सीए गुर्जर यांच्या फर्म मधील सौ. चैताली जोशी व सौ. वैभवी दहातोंडे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. डॉ. अनिकेत घोटणकर यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी प्रास्ताविकात सांगितले की समाजासाठी सेवाभावाने समपर्ण देणारे शेतकरी, डॉक्टर व सीए यांच्या अमूल्य योगदानाची जाणीव अगदी लहानवया पासूनच असावी या उद्देशाने आजचा कार्यक्रम आयोजित केला आहे.समाजातील भावी उत्तम व्यावसायिकांसाठी मनाची जडणघडण व आदर्श मूल्यांचे बीजारोपण बालवयातच व्हावे यासाठी यासाठी विद्यार्थ्यांनी शुभेच्छापत्रे तयार करून परिसरातील शेतकरी, डॉक्टर व सीए यांना दिली.

यावेळी मंथन, लक्ष्यवेध, एन एस सी या स्पर्धा परीक्षांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रकांचे वाटप पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. महिला मंडळांच्या डॉ. विद्या होळे होन्नुर यांनी विद्यार्थ्यांना आहाराबद्दल मार्गदर्शन केले.

संस्थेच्या सेक्रेटरी ज्योती कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की घरी बनवलेले पदार्थच डब्यात असावेत. शक्यतो बाहेरचे पदार्थ खाण्याचे टाळावे.

यावेळी वैद्य अनिकेत घोटणकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास एकाग्रतेने करावा आणि अभ्यास लक्षात राहावा यासाठी आपला आहार चांगला असावा हे आवर्जून सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या डॉ. सौ. अर्चना गिरगे यांनी मुलांना आरोग्यदायी आहाराचे महत्व सांगितले. विद्यार्थ्यांकडून प्राणायाम करून घेतला. त्याला विद्यार्थ्यांनी छान प्रतिसाद दिला.

यावेळी शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. पुष्पा रोहोकले यादेखील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे फलक लेखन सौ. सीमा कवाष्टे व श्रीमती अश्विनी मेंद्रे यांनी केले. पाहुण्यांची ओळख सौ. सातपुते, सूत्रसंचालन श्रीमती निरुपमा देशपांडे यांनी केले. सौ. प्रतिभा पवार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षिका, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# रामाशंकर कनोजिया स्मृती ७-अ-साईड फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ

## भुईकोट किल्ला मैदानावर रंगतोय फुटबॉलचा थरार; २४ संघांचा सहभाग



कै. रामाशंकर कनोजिया (बाटा) स्मृती ७–अ–साईड फुटबॉल स्पर्धेचा शुभारंभ अहिल्यानगर येथील भुईकोट किल्ला मैदानावर उत्साहात झाला.

नगर – कै. रामाशंकर कनोजिया (बाटा) स्मृती ७–अ–साईड फुटबॉल स्पर्धेचा शुभारंभ अहिल्यानगर येथील भुईकोट किल्ला मैदानावर उत्साहात झाला. किल्ला व्हॉलीबॉल सदस्य आणि सुमन एंटरप्रायजेस फुटबॉल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (ADFA) च्या मान्यतेने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या उद्घटनप्रसंगी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, संयुक्त सचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, तसेच कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे व जेव्हिअर स्वामी आदींसह कनोजिया परिवारातील सर्व सदस्य व खेळाडू उपस्थित होते.

स्पर्धेत २४ संघांनी सहभाग नोंदविला असून, जिल्ह्यातील फुटबॉलप्रेमींसाठी ही स्पर्धा आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. उद्घाटनाच्या दिवशी झालेल्या सामन्यांमध्ये सुमन एंटरप्रायजेस एफसीने तक्षिला हायस्कूल संघाचा २–१ असा पराभव केला. तर आयएफसी संघाने फिरोदिया शिवाजियन्स अकादमीवर २–० असा विजय मिळविला.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यात फुटबॉलच्या विकासासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत मानद सचिव रोनप फर्नांडिस यांने व्यक्त केले. सर्व सहभागी संघांना त्यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी राजेश बैद, नंदू लालबोंद्रे, जावेद शेख, फारुख शेख, प्रसाद हराळे, संकेत बनसोडे, आकाश चिंचिने, आसिफ शेख, विलास शेळार, वैभव मनोदिया, शशांक वाल्मिकी, ऋषी पाटोळे, दाऊद शेख, सुमित राठोर आणि प्रकाश कनोजिया यांनी विशेष परिश्रम घेतले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## सर्वांत स्वच्छ सरोवर धोक्यात का?



न्यूझीलंडच्या जंगलांमध्ये लपलेले एक छोटेसे सरोवर सध्या चर्चेत आहे. त्याचे नाव आहे ब्लू लेक अर्थात 'रोटोमायरेवेनुआ'. वैज्ञानिकांच्या मते, हे जगातील सर्वात स्वच्छ गोड्या पाण्याचे सरोवर आहे.जवळपास दहा वर्षांपूर्वी वैज्ञानिकांना आढळून आले होते की, या सरोवराचे पाणी इतके स्वच्छ आहे की, त्यामध्ये ७०-८० मीटर खालपर्यंत स्पष्टपणे पाहिले जाऊ शकते. पाण्याच्या याच अविश्वसनीय शुद्धतेमुळे हे सरोवर जगभरात प्रसिद्ध झाले. आता मात्र या सरोवरासाठी पर्यटकच धोका बनले आहेत. परिस्थिती अशी आहे की, येथील स्थानिक माओरी जमात आणि संवर्धन अधिकारी पर्यटकांना त्यांचे बूट स्वच्छ करण्याची आणि पाण्याला स्पर्श न करण्याची विनंती करत आहेत, जेणेकरून या पवित्र जागेचे रक्षण करता येईल.

स्थानिक माओरी जमात 'न्गाती अपा' यांच्यासाठी हे सरोवर शतकानुशतके पवित्र आहे. पूर्वी येथे मृत लोकांची हाडे धुतली जात होती, जेणेकरून त्यांच्या आत्म्याला स्वर्ग प्राप्त होईल. आजही माओरी लोक या पाण्याला 'तापु' म्हणजे स्पर्श करण्यास मनाई मानतात. २०१३ मध्ये जेव्हा हे सरोवर जगातील सर्वात स्वच्छ सरोवर असल्याची बातमी आली, तेव्हा त्याचे फोटो इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर व्हायरल झाले.

दरवर्षी हजारो लोक पायपीट करत या सरोवराजवळ पोहोचू लागले. सीएनएनच्या अहवालानुसार, 'सोशल मीडियामुळे हे ठिकाण खूप लोकप्रिय झाले.'या ब्लू लेकच्या खालील सरोवरांमध्ये 'लिंडाविया' नावाचे विदेशी शेवाळ पसरले आहे. लोक त्याला 'लेक स्नॉट' म्हणतात. कारण, ते चिकट चिखल तयार करते. हे शेवाळ पर्यटकांचे बूट, बाटल्या किंवा इतर सामानाद्वारे वरच्या ब्लू लेकपर्यंत पोहोचू शकते. त्याचा फक्त एक कण जरी ब्लू लेकच्या स्वच्छ पाण्यात आला, तरी ते पाणी कायमचे गढूळ होईल. यामुळे आता रस्त्यामध्ये क्लीनिंग स्टेशन बनवले आहेत, जिथे बूट, बॅग आणि इतर साहित्य स्वच्छ करणे अनिवार्य आहे.

सरोवराच्या पाण्याला हात लावण्यास सक्त मनाई आहे. येथे पोहणे किंवा फोटो काढण्यासाठी कॅमेरा पाण्यात बुडवणेही कठोरपणे निषिद्ध आहे. उन्हाळ्यामध्ये सरोवराच्या किनाऱ्यावर माओरी किंवा सरकारी वार्डन तैनात असतात. बोर्डावर स्पष्टपणे लिहिले आहे: 'हे पाणी पवित्र आहे, स्पर्श करण्यास मनाई आहे.' माओरी नेत्या जेन स्किल्टन यांनी सीएनएनला सांगितले, 'हे सरोवर आमच्यासाठी केवळ पाणी नाही, तर आमची ओळख आणि आत्मा आहे. एक चूक झाली तर सर्वकाही संपेल.'

## टोटल एल्बो रिप्लेसमेंट



गुडघा किंवा हिप प्रत्यारोपणाच्या तुलनेत कोपराच्या सांध्याचे प्रत्यारोपण (टोटल एल्बो रिप्लेसमेंट) करण्याचे प्रमाण कमी आहे; पण कोपरामध्ये होणाऱ्या तीव्र वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी आणि हाताची हालचाल पूर्ववत करण्यासाठी ही शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वी मानली जाते. ही शस्त्रक्रिया रुग्णांचे जीवनमान सुधारण्यास मोठ्या प्रमाणावर मदत करते.

**कोपराची रचना** : कोपर हा एक बिजागरीसारखा सांधा असून तो प्रामुख्याने ह्युमरस (वरच्या हाताचे हाड), अल्ना (मनगटापासून कोपरापर्यंतचे करंगळीच्या बाजूचे हाड) आणि रेडियस (अंगठ्याच्या बाजूचे हाड) या तीन हाडांनी बनलेला असतो. या हाडांचे सांधे जेथे मिळतात, तो भाग 'आर्टिक्युलर कार्टिलेज' (कुर्चा) नावाच्या मऊ थराने झाकलेला असतो. हा थर हाडांचे रक्षण करतो आणि हालचाल सुलभ करतो. सांध्यामध्ये 'सायनोव्हिअल मेम्ब्रेन' नावाचे पातळ पटल असते. ते वंगणाचे (लुब्रिकंट) काम करणारे द्रव असून यामुळे हाडांमध्ये घर्षण होत नाही.

### शस्त्रक्रियेची गरज का भासते?

*** रुमॅटॉइड आर्थरायटिस (संधीवात):** हा एक ऑटोइम्यून आजार आहे. यात सायनोव्हिअल मेम्ब्रेनला सूज येते आणि ती जाड होते. या तीव्र सुजेमुळे कार्टिलेज नष्ट होते, ज्यामुळे तीव्र वेदना आणि कडकपणा येतो. कोपर प्रत्यारोपणासाठी हे सर्वात मोठे कारण आहे.

***ऑस्टिओआर्थरायटिस (सांधेदुखी) :** वाढत्या वयानुसार सांध्यांची झीज झाल्यामुळे हा त्रास होतो. यात हाडांमधील कार्टिलेज झिजून नष्ट होते आणि हाडे एकमेकांवर घासली जातात.

***पोस्ट-ट्रॉमॅटिक आर्थरायटिस :** कोपराला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे किंवा अस्थिभंगामुळे (फ्रॅक्चर) कालांतराने कार्टिलेज खराब होते आणि सांधा निकामी होतो.

***गंभीर अस्थिभंग (सिव्हियर फ्रॅक्चर):** यामध्ये कोपराचे हाड पूर्णपणे छिन्नविछिन्न होते, तेव्हा सर्जनसाठी ते जोडणे कठीण असते. अशा वेळी, विशेषतः ऑस्टिओपोरोसिस असलेल्या वृद्ध रुग्णांमध्ये कोपर प्रत्यारोपणाचा सल्ला दिला जातो.

### शस्त्रक्रिया कशी केली जाते?

या शस्त्रक्रियेमध्ये कोपराच्या खराब झालेल्या भागांना काढून त्या जागी कृत्रिम सांधा बसवला जातो. हा कृत्रिम सांधा धातू (क्रोम-कोबाल्ट अलॉय किंवा टायटॅनियम) आणि उच्च दर्जाच्या प्लास्टिक (पॉलिइथिलिन) पासून बनवलेला असतो. यात दोन धातूचे स्टेम्सअसतात, जे हाडांच्या पोकळीत 'बोन सिमेंट'च्या साहाय्याने घट्ट बसवले जातात. हे दोन स्टेम्स एका धातूच्या पिनने एकमेकांना जोडलेले असतात. यामुळे सांध्याला बिजागरीसारखी हालचाल करता येते. काही आधुनिक प्रकारांमध्ये रुग्णाच्या स्वतःच्या अस्थिबंधनांचा (लिगामेंट्स) वापर करून विना-पिनचे (नॉन-लिंक्ड) इम्प्लांट्स देखील वापरले जातात. शस्त्रक्रियेनंतर साधारण ६ आठवड्यांपर्यंत हातावर कोणताही भार देण्यास किंवा वजन उचलण्यास पूर्ण बंदी असते. पण त्यानंतर रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल होतो. जेवण बनवणे, कपडे घालणे, केस विंचरणे आणि हलक्या वस्तू उचलणे ही दैनंदिन कामे सहज साध्य होतात.

**- डॉ. सम्यक पंचोली,**
शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन, संपर्क ८९८९३२९३२९

## मंगळावर वाढतो घड्याळाचा वेग

पृथ्वीवर अशी अनेक ठिकाणं आहेत जिथं वेळा एकसारख्या नाहीत. एकट्या भारतातसुद्धा या वेळांमध्ये काहीसा फरक दिसून येतो. त्याचप्रमाणं ग्रहांवरील वेळाचं हे चक्रसुद्धा प्रचंड कुतूहलपूर्ण आणि सातत्यानं बदलणारं आहे. जाणून आश्चर्य वाटेल, पण पृथ्वीचा शेजारी ग्रह मंगळ हा तुलनेनं जीवसृष्टी असणाऱ्या या ग्रहाहून वेगानं पुढे जातो. थोडक्यात मंगळावर घड्याळ 'धावतं' असं म्हणणं गैर ठरणार नाही.

हे तर्कवितर्क नसून, महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी दशकांपूर्वी यासंदर्भातील उलगडा करणारे काही सिद्धांत मांडले होते. नव्या संशोधनानुसार घड्याळाच्या आधारे वेळ निर्धारित करायचा झाल्यास पृथ्वीच्या तुलनेत मंगळावरव घड्याळ वेगानं धावतं. त्यामुळं



येत्या काळातील अवकाश मोहिमांसाठी हे एक आव्हान म्हटलं जात आहे. 'द ॲस्ट्रॉनॉमिकल जर्नल' मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालातील संदर्भ आणि संशोधकांच्या निरीक्षणानुसार मंगळावर दर २४ तासांमध्ये पृथ्वीच्या तुलनेत सरासरी ०.४७७ मिलीसेकंदानं (४७७ मायक्रोसेकंद) इतक्या फरकानं वेळ पुढे धावतो.

ऐकण्यास ही आकडेवारी फार कमी वाटत असेल. कारण, हा सेकंदाचा १००० वा भागसुद्धा नाही. मात्र संशोधन क्षेत्रात आणि प्रामुख्यानं अवकाश मोहिमांसाठी मात्र हा फरक फार महत्त्वाचा आहे. 'नेविगेशन' आणि कम्युनिकेशनसाठी वेळ अगदी अचूक असणं फार महत्त्वाचं असतं. यामध्ये लहानसा फरक जरी पडला करीही अवकाशयान मूळ मार्गापासून भरकटू शकतं. ज्यामुळं संशोधकांच्या माहितीनुसार हे अंतर जाणून घेणं या कारणासाठीसुद्धा महत्त्वाचं आहे, जिथं भविष्यात संपूर्ण सूर्यमालेत एकच 'इंटरनेट' सुरू करता येऊ शकतं. पृथ्वी आणि मंगळावरील वेळेमध्ये हा फरक का? या प्रश्नाचं उत्तर अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या 'जनरल रिलेटिविटी' या पुस्तकात पाहायला मिळतं.

आईन्स्टाईन यांच्या मते वेळ हा गुरुत्वाकर्षणावर आधारित असून, जिथं गुरुत्वाकर्षण अधिक असतं, तिथं वेळ धीम्या गतीनं चालतो आणि गुरुत्वाकर्षण कमी असतं तिथं वेळ अक्षरशः वेग धारण करतो. उदाहरणार्थ, जे जीव समुद्रासपाटीवर राहतात, त्यांच्या तुलनेत पर्वतीय भागांमध्ये राहणाऱ्यांसाठी वेळ थोडा वेगानं चालतो. कारण, पृथ्वीच्या उंचावरील भागांमध्ये गुरुत्वाकर्षणाचा परिणाम तुलनेनं कमी होत जातो. मंगळाची तरलता पृथ्वीहून कमी असून, तिथं गुरुत्वाकर्षणही कमी आहे ज्यामुळं तिथं वेळ वेगानं पुढे जातो.

## मजबूत लाकूड देणारे वृक्षराज

हजारो वर्षांपासून मानव लाकडाचा वापर करत आला आहे. घरबांधणी, फर्निचर, औजारे तसेच मजबूत संरचना उभारण्यासाठी लाकूड महत्त्वाचे साधन ठरले आहे. मात्र प्रत्येक लाकूड सारखेच मजबूत नसते, हेही तितकेच खरे आहे. लाकडाची खरी ताकद त्याच्या आकारावर किंवा बाहेरील जाडीवर ठरत नाही, तर घनत्व, रेशांची रचना आणि टिकाऊपणा यांवर अवलंबून असते. जगभरात अशी अनेक झाडे आहेत, ज्यांचे लाकूड अत्यंत कठीण, जड आणि दीर्घकाळ टिकणारे असते. जगातील अशाच सर्वाधिक कठीण आणि मजबूत लाकूड देणाऱ्या झाडांची ही माहिती....




**ऑस्ट्रेलियन बुलोक :**

'जगातील सर्वाधिक कठीण लाकडांपैकी एक' असा 'ऑस्ट्रेलियन बुलोक' या झाडाचा उल्लेख केला जातो. हे झाड प्रामुख्याने ऑस्ट्रेलियात आढळते. या झाडाचे लाकूड अतिशय सघन असून त्यातील तंतू एकमेकांशी घट्ट जोडलेले असतात. लालसर-तपकिरी रंगाचे हे लाकूड ओरखडे, तडे आणि घर्षण यांना जबरदस्त प्रतिकार करते. हे लाकूड इतके मजबूत असते की ते कापणे किंवा कोरीव काम करणेही खूप कठीण जाते.

**आयरनबार्क :** ऑस्ट्रेलियात उगवणारे आयरनबार्क हे युकॅलिप्टस वृक्षांचे एक प्रकार आहे. कठीण हवामान आणि निकृष्ट जमिनीतही हे झाड सहज वाढते. या लाकडामध्ये नैसर्गिक घटक असतात, जे त्याला कीड, ओलावा आणि कुजण्यापासून संरक्षण देतात. त्यामुळे आयरनबार्क लाकडाचा वापर प्रामुख्याने पूल बांधणी, रेल्वे स्लीपर आणि इतर जड कामांसाठी केला जातो.

**क्वेब्राचो :**

दक्षिण अमेरिकेत आढळणारे क्वेब्राचो हे झाड आपल्या विलक्षण कठीण लाकडासाठी प्रसिद्ध आहे. या लाकडाचे घनत्व इतके जास्त असते की ते पाण्यात टाकल्यास चक्क बुडते. गडद लालसर-तपकिरी रंगाचे हे लाकूड प्रचंड दाब आणि वजन सहज सहन करू शकते. याच्या अत्यंत कठीण स्वरूपामुळे याचा वापर विशेषतः औद्योगिक कामांसाठी केला जातो.



## टाकाऊ तेलातून टिकाऊ प्लास्टिक

टाकून दिलेल्या खाद्यतेलाचे रूपांतर विविध पुनर्वापर करता येणाऱ्या प्लास्टिकमध्ये करण्यात संशोधकांना यश मिळाले आहे. या नवीन प्लास्टिकमध्ये उत्कृष्ट ताकद असून, काही प्लास्टिक तर इतके मजबूत आहेत की, त्यांनी चक्क एका गाडीला ओढून दाखवले. जर्नल ऑफ द अमेरिकन केमिकल सोसायटीमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासात, संशोधकांनी सांगितले की, न खाण्यायोग्य कचऱ्यापासून उपयुक्त पॉलिमर तयार करणे, ही नवीन सामग्री बनवण्याची एक टिकाऊ पद्धत आहे. संशोधकांनी अभ्यासात लिहिले आहे की, 'कचऱ्याचे स्रोत प्लास्टिक बनवण्यासाठी बायोमास-व्युत्पन्न फीडस्टॉक्सला एक आकर्षक आणि संभाव्य पर्याय देतात.' असाच एक कचरा स्रोत म्हणजे वापरलेले स्वयंपाकाचे तेल, जे दरवर्षी सुमारे ३.७ अब्ज गॅलन तयार होते. या टाकाऊ तेलाचा वापर आतापर्यंत वंगण, नॉनस्टिक कोटिंग्ज आणि इंधनामध्ये होत होता; पण तरीही त्याचा मोठा भाग फेकून दिला जातो. नवीन संशोधनामध्ये, शास्त्रज्ञांना टाकाऊ तेलाचे रूपांतर उपयुक्त प्लास्टिक सामग्रीमध्ये करण्याचा मार्ग सापडला आहे, जी मजबूत चिकटणारी आणि पुनर्वापर करता येणारी आहे. तेल हे ग्लिसरॉल (ज्याला ग्लिसरीनदेखील म्हणतात) च्या रेणूंशी बांधलेल्या फॅटी ॲसिडच्या लांब शृंखलांनी बनलेले असते. संशोधकांनी तेलाचे रेणू रासायनिकरीत्या तोडले आणि नंतर त्या उत्पादनांचे मालिकेतील प्रतिक्रियांद्वारे साध्या रेणूंमध्ये रूपांतर केले. अंतिम अल्कोहोल आणि एस्टर रेणू विविध प्रकारे एकत्र करून, संशोधकांना पॉलिएस्टर प्लास्टिकची एक श्रेणी तयार करता आली.

**धोका जाणवला की कासव आपले डोके कवचात लपवतात, अशी एक जुनी आणि प्रचलित समजूत आहे. मात्र ही बाब सर्व कासवांबाबत खरी आहे का? तसेच आज जगभरातील कासवांना कवच आहे, त्यामागचे हेच कारण आहे का?**

## डोके कवचात लपवण्यास कारण की..

तज्ज्ञांच्या मते, काही कासवे डोके कवचात लपवू शकतात, तर काहींना ते शक्य नसते. शिवाय, जीवाश्म पुरावे सूचित करतात की कासवांचे कवच केवळ संरक्षणासाठी विकसित झालेले नाही, तर त्यामागे वेगळीच उत्क्रांती प्रक्रिया होती. जमिनीवर राहणारी कासवे (टॉर्टोईज) ही कासवांची एक प्रजाती असून ती आपले डोके कवचात लपवू शकते. ही उपजात सुमारे ५ कोटी वर्षांपूर्वी उदयास आली, अशी माहिती डेन्व्हर म्युझियम ऑफ नेचर अँड सायन्सचे पृष्ठवंशीय पुराजीवशास्त्राचे वरिष्ठ क्युरेटर टायलर लायसन यांनी दिली. ही कासवे साधारणपणे संथ गतीने हालचाल करतात, त्यामुळे भक्षकांपासून संरक्षणासाठी ती आपल्या कवचावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात. बहुतेक जमिनीवरील कासवांचे कवच घुमटाकृती असते आणि आत पुरेशी जागा असल्यामुळे त्यांना डोके आत घेता येते.

जमीन आणि पाणी दोन्ही ठिकाणी वावरणाऱ्या काही कासवांच्या प्रजातीही असेच करू शकतात. 'कासवांकडे डोके कवचात घेण्याच्या दोन पद्धती आहेत, असे केम्ब्रिज विद्यापीठातील पृष्ठवंशीय प्राण्यांच्या उत्क्रांती व पर्यावरणशास्त्राचे प्राध्यापक जेसन हेड यांनी सांगितले.' एक प्रकार म्हणजे बाजूला मान वाकवणारी कासवे. त्यांची मान लांब असते



आणि ती डोके व मान एका हाताच्या बाजूला वळवतात. दुसरा प्रकार म्हणजे सापासारखी 'एस' आकाराची मान असलेली कासवे, जी मानेला वळण देऊन खांद्याच्या आत ओढू शकतात.

' याचे एक उदाहरण म्हणजे ईस्टर्न बॉक्स टर्टल. या कासवाच्या खालच्या कवचाला, ज्याला प्लॅस्ट्रॉन म्हणतात, एक सांधा असतो. त्यामुळे हे कासव संपूर्ण कवचच बंद करू शकते. मात्र सागरी कासवे हा कासवांचा असा गट आहे, ज्यांना आपले डोके कवचात लपवता येत नाही. सागरी कासवांचे कवच अधिक गुळगुळीत व हलके असते आणि त्यात डोके आत घेण्यासाठी जागा नसते. 'यामुळे शरीरावरचे वजन कमी राहते,' असे हेड यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सागरी कासवे जलद पोहू शकतात तसेच भक्षकांपासून लवकर पळ काढू शकतात.

## अव्हॅस्क्युलर नेक्रोसिसवर मात करताना...

अस्थिक्षय म्हणजेच अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस (एव्हीएन) हा हाडांशी संबंधित वेदनादायक आजार आहे. वैद्यकीय भाषेत याला ऑस्टिओनेक्रोसिस, बोन इन्फार्कशन किंवा इस्केमिक बोन नेक्रोसिस अशा विविध नावांनी ओळखले जाते. यामध्ये प्रामुख्याने खुब्याच्या हाडांची झिज होते. एव्हीएन मागील नेमके कारण काय, याबाबत अद्याप संशोधन सुरू आहे; पण जेव्हा एखाद्या विशिष्ट हाडाला होणारा रक्तपुरवठा खंडित होतो किंवा पूर्णपणे थांबतो, तेव्हा तिथल्या पेशी मृत होऊ लागतात आणि या स्थितीला अस्थिक्षय म्हटले जाते. हाडांच्या निरोगीपणासाठी आणि त्यांच्या पुनर्निर्मितीसाठी रक्तपुरवठ्याद्वारे मिळणारे ऑक्सिजन व पोषक घटक अत्यंत आवश्यक असतात. हा पुरवठा थांबल्यास नवीन हाड तयार होण्याची प्रक्रिया मंदावते आणि जुने हाड कमकुवत होते. प्रामुख्याने नितंबाचे सांधे, गुडघे आणि खांदे या भागांमधील हाडांवर याचा सर्वाधिक परिणाम दिसून येतो.

गेल्या चार-पाच वर्षांमध्ये एव्हीएनच्या समस्येने ग्रस्त असणाऱ्यांची संख्या वाढत आहे. साधारणतः २० ते ७० या वयोगटातील कोणाही व्यक्तीला हा त्रास होऊ शकतो. खुब्याच्या हाडाची झिज झाल्यामुळे रुग्णाला एक प्रकारचे अपंगत्व येते. चालण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. त्यातून अशक्तपणा वाढत जातो. दुसरीकडे ऐन उमेदीच्या वयामध्ये असा त्रास निर्माण झाल्यास त्याचा मानसिक आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होतो.



अनेकांना यामुळे नैराश्य येते. याखेरीज जवळपास १० पैकी ८ जणांना गट हेल्थशी संबंधित म्हणजेच आतड्यांशी संबंधित बिघाडही उद्‌भवतात असे दिसून आले आहे.

अस्थिक्षयाची लक्षणे सुरुवातीच्या टप्प्यात अत्यंत सौम्य किंवा नगण्य असतात. अनेकदा पहिल्या टप्प्यात रुग्णाला कोणत्याही प्रकारची वेदना जाणवत नाही. परंतु, जसजशा हाडांच्या पेशी मृत होऊ लागतात, तसतसे संबंधित सांध्यावर दाब आल्यानंतर वेदना सुरू होतात. नितंबाच्या अस्थिक्षयामध्ये जांघेत, मांड्यांमध्ये किंवा नितंबाच्या भागात तीव्र वेदना होतात. आजार बळावल्यास चालणे, उभे राहणे किंवा पायऱ्या चढणे अत्यंत कठीण होऊन बसते आणि रुग्ण लंगडत चालू लागतो. सांध्यांमध्ये कडकपणा येणे आणि हालचालींची क्षमता मर्यादित होणे ही याची प्रमुख लक्षणे आहेत.

वास्तविक, संबंधित हाडाला रक्तपुरवठा होणे बंद झाल्यामुळे त्यातील कॅल्शियमची पातळी खालावत जाते. परिणामी हे हाड ठिसूळ होऊन त्याचा नैसर्गिक आकारही बदलतो. यावर उपाय म्हणून अनेकदा शस्त्रक्रियेचा पर्याय सुचवला जातो. परंतु होमिओपॅथी उपचारांमध्ये रुग्णांचा वैयक्तिक अभ्यास करून होलिस्टिक उपचार दिले जातात. यामध्ये हाडांना झालेली इजा, दुखापत यामागची कारणे समजून घेऊन रुग्णांचे समुपदेशन केले जाते. त्यानंतर एकुणात रुग्णाची रोगप्रतिकारक शक्ती आणि व्हायटल पॉवर वाढण्यासाठी योग्य ते औषधोपचार दिले जातात. साधारणतः सहा महिने ते वर्षभराच्या उपचारांमध्ये हाडांची झिज भरून निघते. काठी टेकत किंवा भिंतीचा आधार घेत चालणाऱ्या रुग्णांना कसल्याही आधाराशिवाय चालता येणे शक्य होते. पहिल्या ते दुसऱ्या महिन्यातील एक्स रेमध्ये याची खात्री पटल्याने रुग्णांचा आत्मविश्वासही वाढतो आणि निराशेची भावनाही कमी होते. होमिओपॅथिक औषधे कोणत्याही दुष्परिणामांशिवाय पुनरुत्थान प्रक्रियेला गती देतात. थोडक्यात अस्थिक्षय हा एक गंभीर आजार असला तरी योग्य वेळी अचूक निदान झाल्यास शस्त्रक्रियेशिवाय तो नियंत्रित केला जाऊ शकतो.

**- डॉ. तन्मय दर्डा**
**मोबाईल : ९५८८६७८५६६**

## व्हॅम्पायर स्क्विड : जिवंत जीवाश्म!

सेफॅलोपॉड (डोके-पाय) प्राण्यांच्या उत्क्रांतीच्या इतिहासात दीर्घकाळ एक महत्त्वाचा दुवा हरवलेला होता, स्क्विडसारख्या पूर्वजांपासून आजच्या ऑक्टोपसचा उगम नेमका कसा झाला? याचे उत्तर आता खोल समुद्रात सापडले आहे. चमकणारे, भुतासारखे डोळे, ऑक्टोपससारख्या आठ भुजा आणि गडद माणिकरंगाची छटा असलेला दुर्मीळ व्हॅम्पायर स्क्विड (Vampyroteuthis infernalis) अखेर आपली जनुकीय रहस्ये उघड करत आहे. 'आयसायन्स' या वैज्ञानिक नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासात, संशोधकांनी व्हॅम्पायर स्क्विडचा संपूर्ण जीनोम (जनुकसंच) उलगडला.

या अभ्यासातून धक्कादायक बाब समोर आली आहे. ऑक्टोपस गटात मोडत असूनही, या प्रजातीचे



गुणसूत्रे आजच्या स्क्विड आणि कटलफिशसारखेच आहेत. या शोधामुळे सुमारे ३० कोटी वर्षांपूर्वी स्क्विड आणि ऑक्टोपस वेगळे झाले तेव्हा त्यांचा समान पूर्वज जनुकीय पातळीवर कसा दिसत असावा, याची महत्त्वाची झलक मिळते. त्यामुळे संशोधकांनी व्हॅम्पायर स्क्विडला 'जिवंत जीवाश्म' (Living Fossil) असे संबोधले आहे.

ऑस्ट्रियातील व्हिएन्ना विद्यापीठातील न्यूरोसायन्स आणि विकासजीवशास्त्र विभागातील संशोधक ओलेग सिमाकोव्ह यांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्क्रांतीच्या वृक्षात व्हॅम्पायर स्क्विड हा ऑक्टोपस गटात असला तरी, इतर प्रजातींपासून त्याचा अत्यंत प्राचीन काळात विभाजन झाला आहे. पश्चिम पॅसिफिक महासागरातील संशोधन मोहिमेदरम्यान अपघाती जाळ्यात सापडलेल्या व्हॅम्पायर स्क्विडच्या ऊतींचा नमुना मिळाल्यानंतर, संशोधकांनी 'पॅकबायो' या अत्याधुनिक जनुकीय विश्लेषण तंत्राचा वापर करून त्याचे डीएनए अनुक्रमण केले. मात्र, ही प्रजाती अत्यंत दुर्मीळ असल्याने तुलनेसाठी इतर नमुने उपलब्ध नव्हते.

यानंतर या जीनोमची तुलना आर्गोनॉट ऑक्टोपस, सामान्य ऑक्टोपस आणि कर्ल्ड ऑक्टोपस अशा इतर सेफॅलोपॉड प्रजातींशी करण्यात आली. या संशोधनात असे आढळले की व्हॅम्पायर स्क्विडचा जीनोम तब्बल ११ अब्ज बेस-पेअर्सचा आहे, जो मानवी जीनोमपेक्षा जवळपास चारपट मोठा असून, आतापर्यंत अनुक्रमित केलेल्या सर्व सेफॅलोपॉड जीनोम्सपैकी सर्वात मोठा आहे. आजच्या ऑक्टोपस प्रजातींमध्ये डीएनएची सतत फेरमांडणी होत असते, ज्यामुळे गुणसूत्रांचे मिश्रण दिसते. मात्र, व्हॅम्पायर स्क्विडमध्ये ही रचना बरीचशी मूळ, स्क्विडसदृश अवस्थेत जतन झालेली आहे. थोडक्यात सांगायचे तर, व्हॅम्पायर स्क्विड हा दिसायला ऑक्टोपस असला, तरी जनुकीयदृष्ट्या तो प्राचीन स्क्विडसारखा आहे आणि म्हणूनच तो सेफॅलोपॉड उत्क्रांतीच्या इतिहासातील हरवलेला दुवा ठरत आहे.

# ‘पेपरफुटीविरोधात’ अहिल्यानगरमध्ये सम्यक विद्यार्थी संघटनेचे तीव्र आंदोलन

### शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी

नगर – नीट (NEET-UG) आणि टीईटी (TET) परीक्षांमधील लागोपाठ समोर आलेल्या घोटाळ्यांमुळे आणि पेपरफुटीमुळे परीक्षार्थी व पालकांमध्ये सध्या प्रचंड संतापाचे वातावरण आहे. या भ्रष्टाचाराविरोधात आणि विद्यार्थ्यांवर निर्माण झालेल्या मानसिक ताणाविरोधात वंचित बहुजन आघाडीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली, वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने शहरात दिल्लीगेट येथे निदर्शने करण्यात आली. कष्टकऱ्यांच्या मुलांच्या भविष्याशी खेळणाऱ्या या गैरकारभाराचा निषेध करत आंदोलकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली.



‘पेपरफुटीविरोधात’ सम्यक विद्यार्थी संघटनेच्यावतीने दिल्लीगेट येथे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनाचे नेतृत्व करताना सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अजित कुऱ्हाडे म्हणाले की, कष्टकरी, कामगार आणि गरीब पालकांनी रक्ताचे पाणी करून, कर्ज काढून आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसा उभा केला आहे. मात्र, सरकारच्या निष्काळजीपणामुळे आणि परीक्षांमधील सततच्या घोटाळ्यांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलले जात असून ६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे स्वप्न या टीईटी पेपरफुटीमुळे धुळीस मिळाले आहे. या संपूर्ण गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि राज्याचे मंत्री दादा भुसे यांनी तत्काळ आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी संघटनेचे जिल्हा प्रवक्ता विश्वजीत मोरे यांनी परीक्षा पद्धतीवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. हा लढा केवळ परीक्षेपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या मूलभूत हक्कांचा असल्याचे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, भारतीय संविधानातील कलम १९ (अभिव्यक्ती आणि मूलभूत स्वातंत्र्य) नुसार विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे. जोपर्यंत घोटाळेबाजांवर कठोर कारवाई होत नाही आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी संघटनेचा हा लढा कायम सुरूच राहील, असा इशारा त्यांनी दिला.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान व मंत्री दादा भुसे यांनी तातडीने राजीनामा द्यावा, टीईटी आणि नीट परीक्षा घोटाळ्यांची पारदर्शक व कायदेशीर चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि भविष्यात पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायद्याची अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अजित कुऱ्हाडे, उपाध्यक्ष रियाज शेख, उपाध्यक्ष गोविंद राजगुरू, महासचिव विवेक कसबे, उपसचिव पंकज गायकवाड, कोषाध्यक्ष सम्यक डंबाळे, संपर्क प्रमुख दिनेश भालेराव, जिल्हा प्रवक्ता विश्वजीत मोरे, कायदे सल्लागार शुभम पानसरे, जिल्हा संघटक प्रतीक ठोकळ, संकेत शिंदे, अजिंक्य मार्तंड आणि विकास भाबड यांच्यासह संघटनेचे अनेक जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्व आंदोलकांनी हातात निषेधाचे फलक घेऊन No More Excuses, No More Failures अशा घोषणा देत दिल्ली गेट परिसर पूर्णपणे दणाणून सोडला होता.

# ‘वऱ्हाड’ची ५२ पात्रे येणार नगरकरांच्या भेटीला

### कलाकार कट्टाचे आयोजन, ५ जुलै रोजी पुण्याच्या महिलांचे सादरीकरण

नगर – ‘वऱ्हाड निघालंय लंडनला’ या गाजलेल्या एकपात्री नाटकातील बबन्या, काशिनाथ, ज्युडी, जानराव, शास्त्री, वन्स, आत्या...अशी अनेकविध अफलातून पात्रे नगरकरांच्या प्रत्यक्ष भेटीला येणार आहेत. पुण्याच्या महिलांनी ‘वऱ्हाड निघालंय लंडनला’ या एकपात्री नाटकाची बहुपात्री रचना केली असून, त्याचे सादरीकरण ५ जुलै सायंकाळी ६ वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात होणार आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने येथे स्थापन झालेल्या ‘मा. आ. स्व. अरुणकाका जगताप कलाकार कट्टा’ या उपक्रमाच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त या अनोख्या नाटकाचे मोफत आयोजन जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी केले आहे.







‘वऱ्हाड निघालंय लंडनला’ हे डॉ. लक्ष्मण देशपांडे लिखित व दिग्दर्शित अत्यंत गाजलेले व लोकप्रिय मराठी एकपात्री नाटक आहे. या नाटकात लेखक डॉ. लक्ष्मण देशपांडे यांनी एकाच वेळी तब्बल ५२ वेगवेगळ्या भूमिका साकारल्या होत्या. प्रचंड हास्यकल्लोळ उडवणाऱ्या या नाटकातील ही ५२ पात्रे पुण्याच्या शिवसागर रेसिडेन्सीमधील हौशी १६ महिला कलावंतांनी उभी केली आहेत. यातील काही महिला अहिल्यानगरमधीलही आहेत. उच्च विद्याविभूषित व आयटी क्षेत्रासह विविध उद्योग व्यवसायात कार्यरत महिलांनी नाटकाच्या आवडीपोटी या एकपात्री नाटकाचे बहुपात्री रुपांतरण केले आहे. त्याचे सादरीकरण नगरमध्ये होणार आहे. यावेळी आमदार संग्राम जगताप व आमदार अक्षय कर्डिले उपस्थित राहणार आहेत.

या नाटकासाठीच्या मोफत प्रवेशिका जुन्या कोर्टासमोर स्वागत झेरॉक्स, आनंदी बाजार गौरी झेरॉक्स, दिल्ली गेट अतुल पिंपरकर जन्म कुंडली, लंबोदर हॉटेल (भुतकरवाडी चौक), शिंगवी ज्वेलर्स (प्रोफेसर कॉलनी), स्वामी समर्थ मोबाईल (पारिजात चौक, गुलमोहोर रोड), महावीर कलेक्शन (मारुती मंदिर समोर मार्केट यार्ड) व मयुरी मॉल (आगरकर मळा) येथे तसेच प्रयोगाच्या वेळी माऊली सभागृहावरही मिळू शकतील. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. पहिल्या चार रांगा सन्मानिका धारकांसाठी राखीव आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क : सुहासभाई मुळे (मोबा.९८२३७२२२१२.

# शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंक विक्रीवर बंदी

### आ.विक्रम पाचपुते यांच्या विधानसभेतील भूमिकेनंतर मंत्री नरहरी झिरवळ यांचे निर्देश



नगर – राज्यातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न विधानसभेत प्रभावीपणे मांडत श्रीगोंदा–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या वाढत्या वापराबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. त्यामुळे याची तातडीने दखल घेत अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंक विक्रीबंदीचे निर्देश दिले आहेत.

स्टिंग एनर्जी ड्रिंकचे लहान मुलांच्या आरोग्यावर होणारे संभाव्य दुष्परिणाम लक्षात घेता, शाळांच्या परिसरात त्याची विक्री रोखण्याची मागणी आमदार पाचपुते यांनी सभागृहात केली. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, या पेयाच्या बाटलीवरच लहान मुले व गर्भवती महिलांनी हे पेय सेवन करू नये, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना हे पेय सहज उपलब्ध होणे चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले.

या चर्चेनंतर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी विषयाची गंभीर दखल घेत, राज्यातील सर्व शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर बंदी घालण्याचे निर्देश देण्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता आणि उज्ज्वल भवितव्य यासाठी आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत मांडलेला हा मुद्दा महत्त्वपूर्ण ठरला असून, शासनानेही त्यावर तातडीने सकारात्मक भूमिका घेतली आहे.

# अहिल्यानगरमध्ये ४ जुलै रोजी धनगर समाजाचा मेळावा



नगर – यशवंत सेना, अहिल्यानगर आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने धनगर समाजाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शहरातील टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात हा मेळावा होणार असून, समाजातील विविध प्रश्नांवर चर्चा, मार्गदर्शन, तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर यांनी केले आहे.

पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार असून, यशवंत सेना महाराष्ट्राचे राज्याध्यक्ष माधव (भाऊ) गडदे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजातील गुणवंत, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी आणि कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

मेळाव्याला सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रविण कोरगंटीवार, जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश देविदास पाटील, दिव्यांग विकास महामंडळाच्या सहाय्यक आयुक्त संगीता डावकर, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक ए. एस. त्रिभुवन, प्राचार्य तुळशिराम रामभाऊ भोजने, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, ओबीसी महामंडळाचे संचालक विनोद लोंढे, समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, नगरसेवक ज्ञानेश्वर शिवाजी येवले, विजय पठारे, मनोज कोतकर, यशवंत सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय तमनर, अरुण वाघमोडे, डॉ. राहुल पंडित आदी उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्यात धनगर समाजासमोरील विविध सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर उपस्थित मान्यवर मार्गदर्शन करणार असून, समाजातील युवक, महिला आणि विद्यार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ कसा मिळविता येईल, याबाबतही माहिती दिली जाणार आहे.

यावेळी इतिहासाचे अभ्यासक प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ हे ‘लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य, राज्यकारभार आणि सामाजिक योगदान’ या विषयावर विशेष व्याख्यान देणार आहेत. त्यांच्या व्याख्यानातून अहिल्यादेवींच्या आदर्श नेतृत्वाची, लोककल्याणकारी कारभाराची आणि सामाजिक बांधिलकीच्या कार्यावर उजाळा टाकला जाणार आहे. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सदस्य प्रयत्नशील आहेत.

# अहिल्यानगर जिल्ह्यात अतिवृष्टी, हवामान खात्याने दिला इशारा

नगर –भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यात ३ जुलै रोजी तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुटण्याची शक्यता आहे. तसेच ४ जुलै रोजी जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रसिद्धी पत्रक जारी करून जिल्ह्यातील नागरिकांना विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.

प्रशासनाने नागरिकांना सूचित केले आहे की, मेघगर्जना आणि विजा चमकत असताना झाडांखाली किंवा मोकळ्या जागेत उभे राहू नये. विजांपासून संरक्षणासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा आणि भारत सरकारच्या दामिनी पचा वापर करावा. वादळादरम्यान कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये, तसेच ट्रॅक्टर, शेतीची अवजारे व दुचाकी वाहनांपासून दूर राहावे. मोकळ्या मैदानात अडकल्यास जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवून गुडघ्यांवर बसून डोके व कान झाकून घ्यावेत. याशिवाय रस्त्यावरील जाहिरात फलक (होर्डिंग्ज), टॉवर्स, विद्युत खांब आणि जुनाट व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या आसपास आश्रय घेणे टाळावे.

नदी, ओढे आणि नाल्याकाठच्या नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे आणि पाण्याचा प्रवाह वाहत असणारे पूल किंवा बंधारे ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. अतिवृष्टीमुळे भूस्खलन आणि दरडी कोसळण्याची शक्यता असल्याने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी वेळीच सावध व्हावे व घाट रस्त्यांनी प्रवास करणे टाळावे. धरण व नदीक्षेत्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्यात उतरू नये आणि धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासन, पोलीस स्टेशन किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच मदतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाच्या ०२४१–२३२३८४४, २३५६९४० किंवा ११२ आणि १०७७ या टोल फ्री क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘माहिती अधिकार नियमावलीला सरकारने स्थगिती दिल्याने’ अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धीतील ५ जुलैचे उपोषण तात्पुरते मागे

### नवी नियमावली कायमची रद्द न केल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा

नगर – महाराष्ट्रातील जागरूक जनता आणि राळेगणसिद्धी परिवाराच्या शांततापूर्ण लोकशाही मार्गाने उभ्या राहिलेल्या जनदबावामुळे महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार नियमावली २०२६ स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या या निर्णयानंतर ज्येष्ठ समाजसेवक कि. बा. तथा अण्णा हजारे यांनी ५ जुलै पासून राळेगणसिद्धी येथे सुरू करण्याचे जाहीर केलेले आपले उपोषण सध्या स्थगित केले आहे. राज्यातील कार्यकर्ते आणि राळेगणसिद्धी ग्रामस्थांनी केलेल्या विनंतीमुळे हा निर्णय घेतला असून, हा निर्णय सरकारवर विश्वास ठेवून नव्हे, तर त्यांनी सुरू केलेल्या सकारात्मक प्रक्रियेला संधी देण्यासाठी घेतला असल्याचे अण्णा हजारे यांनी स्पष्ट केले आहे.

ही केवळ स्थगिती आहे, अंतिम निर्णय नाही, माहितीच्या अधिकाराला कमकुवत करणारी ही नियमावली पूर्णपणे रद्द होऊन लोकांच्या हक्कांचे संपूर्ण संरक्षण व्हावे, अशी जनतेची अपेक्षा आहे. शासनाने जर ही प्रक्रिया अर्धवट ठेवली किंवा नियमावली कायमची रद्द करण्याबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर लोकशाही मार्गाने पुन्हा आंदोलन उभे केले जाईल, असा इशारा अण्णा हजारेंनी दिला आहे.

आज त्यांचे वय ९० वर्षे असून वयोमानानुसार प्रकृतीच्या अनेक तक्रारी असतानाही, आपल्या हयातीत हा कायदा कमकुवत होताना शांत बसू शकत नसल्यानेच त्यांनी उपोषणाचा निर्णय घेतला होता. माहितीचा अधिकार कायदा हा शासन व्यवस्थेतील उत्तरदायित्व, पारदर्शकता व लोकसहभागासाठी अत्यंत महत्त्वाचा असून तो सामान्य नागरिकाच्या हातातील भ्रष्टाचार आणि गैरकारभारास आळा घालण्याचे प्रभावी शस्त्र आहे.

अण्णा हजारेंनी प्रत्येक नागरिकाला आवाहन केले आहे की, कोणतीही व्यक्ती कायमची नसते, मात्र तत्त्वे आणि लोकशाही मूल्ये कायम राहिली पाहिजेत. त्यामुळे त्यांच्या पश्चात माहितीच्या अधिकारासारख्या लोकहिताच्या कायद्यांचे रक्षण करण्याची आणि कोणालाही तो कमकुवत करू न देण्याची जबाबदारी आता प्रत्येक जागरूक नागरिकाची असेल. जागरूक नागरिकांचा शांततापूर्ण आणि संघटित दबाव निर्माण झाला की कोणत्याही सरकारला जनहिताचे निर्णय घ्यावेच लागतात, हाच लोकशक्तीचा विजय असल्याचे सांगत त्यांनी सकारात्मक पाऊल उचलल्याबद्दल शासनाचे आभार मानले व नागरिकांना आपल्या हक्कांबाबत कायम जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे.

# आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी सौ. निता ताराचंद जाधव गेल्या ५ वर्षांपासून योगा क्लासला नियमित येत आहे.

योग ही एक जादू आहे. निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली म्हणजे योग. योगासने आणि प्राणायाममुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते. स्नायू बळकट होतात व पचनक्रिया सुधारते.

नियमित योगाभ्यासामुळे ताण–तणाव आणि चिंता कमी होऊन मन एकाग्र होते.

स्त्रियांचे जीवन घर, कुटुंब, मुले, मुली यांचे सर्व काही करण्यात जात असते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला हव नको ते तत्पर हजर करुन देणारी स्त्री मात्र स्वतःच्या आरोग्याकडे, व्यक्तिमत्वाकडे पाहण्याचे विसरुन जाते. मी ही त्या चक्राचाच एक भाग होते. स्वःताचे आरोग्य उत्तम असावे असे मलाही वाटायचे. आपल्याला काही झाल्यास आपल्या कुटुंबाचे कसे होणार ? हा विचारही मनात सतावत असायचा. पण यातून मार्ग सापडत नव्हता.

अशातच मला राखी गांधी या मैत्रिणीकडून श्री. मेहेर सर यांच्या आनंद योग सेंटरची माहिती मिळाली. नेमके तेथे काय चालते हे पाहण्याचा मी निश्चय केला व सरांच्या योग क्लासला जॉईन झाले.

सरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार योगासने, विविध व्यायामप्रकार नियमित प्रकारे करु लागले. त्याचा दृश्य परिणाम थोड्याच दिवसात मला दिसू लागला. थोडे फार शारिरीक प्रॉब्लेम होते ते कधी निघून गेले समजले पण नाही. माझ्यातील आत्मविश्वास वाढू लागला. श्री. मेहेर सरांची समजावून सांगण्याची पध्दत अप्रतिम आहे. त्यांच्यामुळे मला क्लासमध्ये येण्याचे भाग्य लाभले. या ठिकाणी माझ्या कुटुंबाप्रमाणे मला प्रेम मिळाले.

माझे प्रत्येक सुख दुःख मी या ठिकाणी सांगू शकते असे सहकारी मला या क्लासमध्ये मिळाले.

सरांची प्रत्येकाच्या आरोग्याविषयी असणारी तळमळ त्यांच्या प्रत्येक कृतीमधून दिसून येते. प्रत्येकाबद्दलचा त्यांचा जिव्हाळा मला अनुभवायला मिळाला.

योगाभ्यासामुळे मला आत्मिक शांती प्राप्त झाली. दररोजच्या कामामध्ये उत्साह वाढला. मला कामातून वेळ मिळत नाही अशी कारणे आपण इतक्या दिवस निरर्थक करत होतो याची जाणीव झाली.

आजच्या धकाधकीच्या जीवनात स्वतःसाठी वेळ काढणे किती आवश्यक आहे याची जाणीव आनंदयोग सेंटर या ठिकाणी आल्यावर झाली. सुंदर से भाऊ आणि वहिनी, इतर सहकारी मिळाल्याबद्दल आनंद योग सेंटरची मी मनापासून ऋणी आहे.

या योग सेंटर मध्ये अनेक आनंददायी उपक्रम राबवले जातात. यातही मी सहभागी होऊन आनंद उपभोगते. या मिळालेल्या संधीबाबत मी श्री. मेहेर सर यांची सदैव ऋणी राहील.

स्त्रियांनी फक्त घर, काम या गोष्टीला प्राधान्य देताना स्वतः च्या सर्वांगीण विकासाकडे ही लक्ष देणे तितकेच महत्वाचे आहे.

स्त्री ही घराचा कणा ओ ती बळकट हवीच ना ?

मग आजच निश्चय करा व आनंद योग सेंटरला जॉईन व्हा.

अशी संधी आपणास पुन्हा मिळणार नाही. स्वतः या व हा सत्य अनुभव प्रत्यक्षात अनुभवा. ‘हेल्थ ईज वेल्थ’ करा योग रहा निरोग.





**– सौ. निता जाधव,**
गायके मळा, मोरचूद नगर, केडगाव

# महिला उद्योजक व छोटे उद्योजकांचे विक्री, ब्रँडिंग आणि प्रचारासाठी प्रदर्शनाची गरज

### महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; शमी गणपती मंगल कार्यालय येथे उद्योजक प्रदर्शन व विक्री स्टॉलचे उद्घाटन

नगर – ही फक्त बाजारपेठ नाही. ही आपल्या मातीतले कष्टकरी हातांना आधार देणारी चळवळ आहे. ही स्वदेशी वस्तूंचा प्रोत्साहन देणारी अभिमानाची संधी आहे. उद्योजक महिला बचत गट शेतकरी आणि तरुणांसाठी नवीन दिशा आहे. आवडीच्या वस्तू, गुणवत्ता आणि रास्त दर आता एकाच छताखाली उपलब्ध करण्यात आले आहे. या प्रदर्शन व विक्री मेळाव्यातून महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच महिला उद्योजकांसाठी एक व्यासपीठ निर्माण झाले आहे.महिला उद्योजक व छोटे उद्योजकांचे विक्री व ब्रँडिंग व प्रचारासाठी प्रदर्शनाची गरज आहे, असे प्रतिपादन महानगरपालिकेचे महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी केले आहे.





महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृत व प्रतिबिंब संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शमी गणपती हॉल, दिल्लीगेट येथे बचत गटांचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. याप्रसंगी या उपमहापौर धनंजय जाधव, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, माजी सभापती नरेंद्र कुलकर्णी, शमी गणपती मंदिर अध्यक्ष विनायक देशमुख, अमृत जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे, संयोजिका अनुजा कांबळे, वनिता मानकर, जयश्री सूळ, ऋतुजा धोत्रे, प्रिया भागवत आदिंसह महिला उद्योजक.

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृत व प्रतिबिंब संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शमी गणपती हॉल, दिल्लीगेट येथे बचत गटांचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. या प्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, माजी सभापती नरेंद्र कुलकर्णी, शमी गणपती मंदिर अध्यक्ष विनायक देशमुख, अमृत जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे, संयोजिका अनुजा कांबळे, वनिता मानकर, जयश्री सूळ, ऋतुजा धोत्रे, प्रिया भागवत आदिंसह महिला उद्योजक उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, या प्रदर्शन व मेळाव्यातून महिलांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच महिलांना उद्योग व्यवसायासाठी चांगली संधी निर्माण झाली आहे. नगरकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी.

अनुजा कांबळे म्हणाले, या प्रदर्शना मध्ये कपडे, ज्वेलरी, कॉस्मेटिक्स, किड्स वेअर, फूड स्टॉल, आयुर्वेद, उन्हाळी वाळवण, गृहपयोगी वस्तू आदींचे स्टॉल उपलब्ध आहेत. प्रतिबिंब संस्था व स्थानिक उत्पादकांनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे ’अमृतपेठ–थेट बाजारपेठ’ हा विशेष उपक्रम राबवला जातो. अहिल्यानगर मध्ये मार्च व मे महिन्यात भरलेल्या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे आता पुन्हा एकदा या उपक्रमाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले असून, ३,४ व ५ जुलै रोजी बचत गटांचे प्रदर्शन व विक्री ग्राहकांसाठी खुली करण्यात आली आहे. नगरकरांनी या प्रदर्शनाला भेट देऊन उद्योजकांचा उत्साह वाढवावा.

सागर भोपे म्हणाले, अमृत संस्था व प्रतिबिंब संस्था–अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वदेशी आणि दर्जेदार उत्पादने हे अमृतपेठ चे वैशिष्ट्य असून, ग्राहक आणि उत्पादक अशा दोघांसाठीही हा उपक्रम फायद्याचा ठरतो. सूत्रसंचालन ऋतुजा धोत्रे यांनी केले. नक्षत्रा कांबळे यांनी आभार मानले.

